रविवार, 14 ऑगस्ट 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 20
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SUNDAY 14 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-20 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5



## अबब.. शेतकऱ्याने शेतात उभारले चक्क ७५ राष्ट्रध्वज

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** शेतकऱ्यांना कोरोना काळापासून शेती विषयक विविध समस्यांनी ग्रासले आहे. मात्र सरकार याकडे लक्ष दयायला तयार नाही. त्यामुळे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शिवडी ता.निफाड येथील शेतकरी रामनाथ शिंदे यांनी त्यांच्या द्राक्षेबागेत चक्क ७५ राष्ट्रध्वज उभारून सरकारचे लक्ष वेधले असून तालुक्यात हा चर्चेचा विषय ठरला आहे.

देशाचे तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान, जय किसान' या घोषणेद्वारे देशाचा रक्षणकर्ता व पोषणकर्ता यांना देशविकासाचा केंद्रबिंदू माणूनही देशाचा पोषणकर्ता मात्र अद्यापही पारतंत्र्यात आहे. आपल्या शेतीप्रधान देशात स्वातंत्र्याला ७५ वर्ष होऊनही शेती आणि शेतकरी अद्यापही पारतंत्र्यात असून त्याला त्यानेच पिकवलेल्या शेतीमालाला भाव ठरवण्याचा अधिकार नाही. कित्येक सरकारे आली आणि गेली मात्र त्यांनी शेतीसाठी ठोस असे निर्णय घेतले नाही. सरकारांनी शेतकऱ्यांचे उतारे कोरे करण्याचे निवडणूक पूर्व आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही दोन लाखाच्या वरील कर्जमाफी प्रलंबित आहे. कोरोना काळात शेतकऱ्यांना मातीमोल भावात शेती उत्पादन विकावे लागले होते. द्राक्षे उत्पादक अत्यंत आर्थिक अडचणीत सापडले आहेत. निफाड तालुक्यात एक द्राक्षे उत्पादक शेतकऱ्याने आत्महत्या देखील केली आहे. सध्या पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले मात्र त्यांचे अद्यापही पंचनामे नाहीत. ज्यांचे झाले त्यांना एकरी ५ हजार अशी अत्यल्प नुकसानभरपाई जाहीर केली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग संतप्त आहे. दुष्काळात तेरावा महिना म्हणून कांदा पिकाचे भाव गडगडले आहेत. आस्मानी आणि सुलतानी संकटांच्या कात्रीत सापडलेल्या शेतकऱ्यांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातही मायबाप सरकार न्याय देईल का? असा प्रश्न शिंदे यांनी या अनोख्या कृतीतून विचारला आहे. अशाही देशप्रेमी शेतकऱ्याची तालुक्यात अनोखी चर्चा सुरू आहे.

# पदे मिळाली, करा मजा

## उद्धव ठाकरेंची शिंदे सरकारवर परखड टीका!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर महिन्याभराने अखेर मंत्रीमंडळ विस्ताराला मुहूर्त सापडला. मात्र, अद्याप मंत्र्यांना खातेवाटप करण्यात आलेले नाही. या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून सरकारवर तोंडसुख घेतले जात असताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज एकनाथ शिंदे सरकारवर परखड शब्दांत टीका केली आहे. तिकडे जायला मंत्री कुठे आहेत? मंत्र्यांचे खातेवाटपच झालेले नाही. सगळे मंत्री आज आझाद आहेत. आझादी का अमृत महोत्सव. पदे मिळाली आहेत, पण जबाबदारी नाही. करा मजा, असे 'मार्मिक' व्यंगचित्र साप्ताहिकाच्या ६२व्या वर्धापनदिनी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून उद्धव ठाकरेंनी ऑनलाईन संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.**

आम्हीच मूळची शिवसेना असा दावा करणाऱ्या शिंदे गटाला उद्धव ठाकरेंनी टोला लगावला आहे. काही जणांना असे वाटते की शिवसेना उघड्यावर पडलेली वस्तू आहे जी कुणीही उचलून घेऊन जाऊ शकते. पण तसे नाही. शिवसेनेची पाळेमुळे ही किमान ६२ वर्ष तरी दिसत आहेत. माझ्या आजोबांनी ही विचारांची पेरणी केली होती, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

### मंत्री आहेत कुठे?

दरम्यान, राज्यात अद्याप खातेवाटप न झाल्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारला सवाल केला आहे. राज्यात काही ठिकाणी अतीवृष्टी झाली आहे. पण महाराष्ट्रातले सरकार आहे कुठे? काहीही न करता स्वतःचे सत्कार करून घेतले जात आहेत. पण अतिवृष्टीमुळे शेतकरी बेहाल झाला आहे.

तिकडे जायला मंत्री कुठे आहेत? मंत्र्यांचे खातेवाटपच झालेले नाही. सगळे मंत्री आज आझाद आहेत. आझादी का अमृत महोत्सव. पदे मिळाली आहेत, पण जबाबदारी नाही. करा मजा, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.



### आपण पुन्हा गुलामगिरीकडे जातोय का?

आपण स्वतंत्र होऊन ७५ वर्ष झाली. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना पुन्हा आपण गुलामगिरीकडे जात आहोत का? हा विचार करण्याची वेळ आली आहे, असंही ते म्हणाले. व्यंगचित्रकारांना एवढंच सांगतो, की देश पुन्हा गुलामगिरीकडे जात असेल, तर तुम्ही त्यावर तुमच्या ब्रशचे फटकारे मारलेच पाहिजेत, असं उद्धव ठाकरेंनी यावेळी बोलताना नमूद केले.

### तुमची कितीही 'कुळं' खाली उतरली तरी...

उद्धव ठाकरेंनी या व्यंगचित्रांमधून भाजपावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. तसेच भाजपामध्ये नुकतंच झालेल्या खांदेपालटाच्या मुद्द्याला स्पर्श करत उद्धव ठाकरेंनी बावन असो किंवा मग एकशे बावन्न असो, तुमची कितीही कुळं खाली उतरली तरी शिवसेना संपणार नाही, असे म्हणत भाजपाला जोरदार टोला लगावला. अस्वस्थ मनाच्या वेदनेला वाचा फोडण्याचे काम व्यंगचित्रकार करतो. त्यामुळे लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आपण काम केले पाहिजे, यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या 'हर घर तिरंगा' मोहिमेवरही टीका केली.

## आरएसएसचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान विचारणाऱ्यांचा इतिहासाचा वर्ग घ्यावा लागेल : तेजस्वी सूर्या

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यात भाजप युवा मोर्चाद्वारे आयोजित 'हर घर तिरंगा' कार्यक्रमाअंतर्गत विविध ठिकाणी सभा घेण्यात येत आहेत. यासंबंधीची एक सभा मॉडर्न कॉलेजमध्ये घेण्यात आली. त्यावेळी भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष तेजस्वी सूर्या म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान काय असा प्रश्न अनेक जण विचारत आहेत. असा प्रश्न विचारणाऱ्यांना भाजप युवा मोर्चाकडून विशेष वर्ग भरवला जाईल व त्यामध्ये इतिहास सांगून त्यांच्या ज्ञानात भर घातली जाईल. भारतच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये सर्वांचे योगदान आहे.

सूर्या पुढे म्हणाले, सध्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात एकात्मता रहावी यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी हर घर तिरंगा हा उपक्रम महत्त्वाचा आहे. पुणे ही छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळगंगाधर टिळक यांची भूमी आहे. या पवित्र



भूमीत आपल्याला हर घर तिरंगा फडकवायचा आहे.

जम्मू काश्मीरमध्ये 370 कलम हटवल्यानंतर भारतीय तिरंगी ध्वजाचा मान वाढला आहे. 30 वर्षानंतर लाल चौकात तिरंगा फडकवण्याचा मान मिळाला आहे, असं वक्तव्य तेजस्वी सुर्या यांनी केले.

## बिहारमध्ये अनेक खासदार नितीश कुमारांच्या संपर्कात; भाजपा-एनडीएला मोठा धक्का बसणार

आधुनिक केसरी न्यूज

**पाटणा :** बिहारमध्येनितीश कुमार यांनी जबरदस्त खेळी करत लालू प्रसाद यादवांच्या आरजेडीशी हातमिळवणी करून भाजपाला सत्तेतून बाहेरची वाट दाखवली होती. बदललेल्या सत्तासमीकरणांमध्ये नितीश कुमार यांच्याकडे बिहारचं मुख्यमंत्रिपद कायम आहे तर तेजस्वी यादव यांची उपमुख्यमंत्रिपदी निवड झाली आहे. दरम्यान, नितीश कुमार एवढ्यावरच थांबलेले नाहीत. आता ते लोकसभेमध्ये एनडीएला मोठा धक्का देण्याची तयारी करत आहेत.

समोर येत असलेल्या माहितीनुसार बिहारमधील एनडीएचे तीन खासदार जेडीयू आणि आरजेडीच्या वाटेवर आहेत. हे तिन्ही खासदार लोकजनशक्ती पार्टी (पारस गट) मधील आहेत. केंद्रीय मंत्री पशुपती पारस यांनी ते एनडीएसोबत राहतील अशी घोषणा केली होती. अशा परिस्थितीत खगडिया येथील



खासदार महबूब अली कैसर आरजेडीमध्ये जाऊ शकतात. तर वैशाली येथील खासदार वीणा देवी आणि नवादा येथून खासदार चंदन सिंह जेडीयूमध्ये दाखल होऊ शकतात.

२०१९ मध्ये लोकजनशक्ती पार्टीचे सहा खासदार जिंकले होते. गतवर्षी लोकजनशक्ती पार्टीमध्ये फूट पडल्यानंतर पारस यांच्यासोबत पाच खासदार आले होते. तर चिराग पासवान एकटे राहिले होते. आता जमुईमधील खासदार चिराग पासवान, हाजिपूर येथून खासदार असलेले पशुपती पारस आणि समस्तीपूर येथून खासदार असलेले प्रिंस हे एकाच कुटुंबातील ३ खासदार वगळता उर्वरित खासदारा एनडीए सोडण्याची शक्यता आहे.

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना...

आधुनिक केसरी

15 ऑगस्ट 1947 या मंगलदिनी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. दोनशे वर्ष भारतामध्ये इंग्रजांनी भारतीयावर अन्वित अन्याय करून देशांमधील अमाप संपत्ती लुटून नेली. आणि देश कंगाल करून ठेवला. परंतु त्यानंतर भारताच्या पंचाहत्तर वर्षाच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण करताना अनेक बाजू पडताळून पाहावयास लागतात. भारत देशाचा आर्थिक दृष्ट्या एक बलाढ्य आणि स्वयंपूर्ण राष्ट्र म्हणून गाजावाजा होताना दिसतो. परंतु भारतातील तळागाळातील माणूस, शेतकरी, शेतमजूर, गरीब, शोषित पुरुष -स्त्री आजही पै पै साठी टाचा झिजवताना दिसत आहेत. एकवेळच्या पोटाची भ्रांत त्यांच्या समोरून हटत नाही. ही पंचाहत्तर वर्षात दुसरी लाजिरवाणी बाब कोणती असू शकेल? श्रीमंत आपल्या भ्रमात आहेत, गरीब उद्याच्या पोटाचे काय? सर्वसामान्य आर्थिक तंगीमुळे तारेवरच्या कसरती करून बेजार झालेला आहे आणि आपण भारत महासत्ता करून दाखवणारा भ्रमाचा भोपळा घेऊन मिरवत आहोत ही कितीतरी वेदनादायी गोष्ट आहे.



दत्ताबापू काळुंके

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेद्वारे स्वातंत्र्य, बंधुता, समता दिली. परंतु येथे समतेचे राज्य आहे का? बंधुभाव समाजात नांदत आहे काय ? समता तत्वांची झालेली पायमल्ली आज स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना कित्येकदा विचार करण्यास भाग पाडत आहे. राजकीय सत्ता स्व भोवती गुंतल्यामुळे समाजाचा विकास सदोदित रेंगाळला. मग भारताच्या नेतृत्वाखाली झालेला विकास म्हणजे सर्व काही नव्हे? भारतातील प्रत्येक नागरिकाची आर्थिक स्वातंत्र्याची कोंडी व्यवस्थेने केल्यामुळे भारताची गरीब नष्ट होऊ शकली नाही. हे कितीतरी दुर्दैवी आहे. परंतु विशिष्ट लॉबीमुळे आणि त्यांच्या संपत्तीमुळे वैभवपूर्ण आणि गौरवशाली राष्ट्र म्हणून जगाच्या क्षितिजावर भारत नांदत आहे. अशा खोट्या वल्गना करून विशिष्ट लोक आपल्या पोळ्या भाजून घेताना दिसत आहेत. हे हास्यास्पद नाही काय ? बेकारी, बेरोजगारी, दारिद्र्य, महागाई, शिक्षणाचा बट्ट्याबोळ, शेतकऱ्यांचे भयावह हाल, स्त्रियांचे गंभीर प्रश्न, गरिबांचे अनेक प्रश्न हे 75 वर्षात आपण सोडवू शकलो नसल्याने भारत शाश्वत विकासाचा निर्माता आणि शिल्पकार कसा होईल हा प्रश्न आहे ?


राष्ट्रीय एकात्मकतेच्या भूमिकेला बाधा आणीत, सर्वधर्म, सर्व भाषिक, सर्व वंशाच्या लोकांना न्याय कसा मिळेल? लोकशाहीचा मुडदा पाडून वेगवेगळ्या भावनिक प्रश्नावर




लोकांना काही कार्यक्रम देणे आणि प्रतिसाद मिळवणे हे तुलनेने सोपे असते. पण आता अमृत महोत्सवाच्या प्रसंगी ही देशासाठी मोठी कसोटी आहे. आर्थिक प्रश्न गुंतागुंतीचे आणि जटील बनत आहेत. अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक कमजोर होताना दिसत आहेत. शहरी भागात अर्थस्थिती नाजूक आहे, तर ग्रामीण भागात आर्थिक मरगळ नेहमीच चक्कर येऊन पडत आहे. या दोन्ही घटकांची क्रयशक्ती का कमी झाली? याच्या मुळाशी न जाता मन की बात द्वारे भावनिक आव्हान करून मूलभूत प्रश्नांपासून बाजूला होण्याचे काम होताना दिसत आहे. गरीबांचे हाल, वंचितांचे दुखणे, शेतकऱ्यांचे मोडलेले कंबरडे, शेतीमालाचा ढासळलेला हमीभाव, महागाईने मेटाकुटीस आलेले जीव आणि सर्वसामान्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न न सुटल्यामुळे भारताचा विकास ठराविक टप्प्यात अडकून पडला आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाकडे केवळ 256 कोटी रुपये थेट विदेशी गुंतवणूक होती. आता ती थेट विदेशी गुंतवणूक 81 अब्ज कोटीवर गेली आहे. 2021- 22 चा जीडीपी 147.79 लाख कोटीवर आहे.असे असले तरी मूलभूत प्रश्न, आर्थिक विकासाची कोंडी, गरिबांची पीछेहाट, सर्वसामान्यांची दबलेली आर्थिक नाळ आणि आर्थिक असमानता रुजू न देण्यासाठी केलेले जाणीवपूर्वक प्रयत्न हानिकारक ठरत आहेत. याकडे मुद्दामून डोळेझाक होताना दिसत आहे.

म्हणून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात आर्थिक कसोटीचा काळ गरीब, आदिवासी, दलित, शेतकरी, शेतमजुर, श्रमिक आणि सर्वसामान्यांच्या मुळावर येऊन ठेपला आहे. आर्थिक विकास रोजगाराने भक्कम करावा लागेल. त्यातच बेरोजगारी हे एक मोठे तगडे आव्हान आहे. ते सोडविण्यासाठी सर्वकष प्रयत्न होणे गरजेचे आहे. परंतु सत्तेत आल्यानंतर उपाययोजना न करता लोकांना केवळ टाळ्या-थाळया वाजवण्यात न गुंतवता या भयावह परिस्थितीचा सूक्ष्म विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. तेव्हाच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सार्थकी झाला असे म्हणावे लागेल.

**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ‘ एक अवलिया गायक किशोरकुमार ...’

आधुनिक केसरी

तो उत्तम अभिनेता होता, गायक होता, गीतकार, संगीतकार, दिग्दर्शक, निर्माता, पटकथा लेखक आदी सगळे काही होता. आणि त्यातील प्रत्येक क्षेत्रात त्याला यशही मिळाले. त्याने किशोरकुमार हे धारण केलेले नाव सार्थ ठरवले कारण किशोराप्रमाणेच तो अखेरपर्यंत आनंदाने गातच राहिला. गंभीरपणा असा त्याच्या स्वभावात नव्हताच ! कायम हसतमुख आणि दुसऱ्यांना आपल्या हास्यविनोदाने सतत हसत ठेवणारा !

काही चित्रपटात किशोरकुमारचा अभिनय आणि गाणी असा दुग्धशर्करा योग जुळून आला आहे. त्याचे मधुबाला बरोबर ‘ चलती का नाम गाडी ‘ या चित्रपटातील ‘ एक लडकी भिगी भागीसी..’ हे गीत गातानाचा अभिनय, पावसात भिजलेली मधुबाला आणि सचिन देव बर्मन यांचे संगीत यांचा फॉर्मुला मस्त जुळून आला आहे. पडोसन मधील एक चतुर नार हे गाणे तर अप्रतिमच ! हास्यविनोद, संगीत, अभिनय आणि गायकी यांचा अद्भुत संगम असलेले हे गीत तर आपल्याला खिळवून ठेवते. किशोरकुमार यांच्या सोबत सुनील दत्त, सायरा बानू, मेहमूद यांचा अप्रतिम अभिनय आपल्याला या गाण्यात बघायला मिळतो. काही गाणी दृक आणि श्राव्य अशा दोन्ही माध्यमात प्रभावी ठरतात, अशा गाण्यांपैकी हे एक आहे. ONE OF THE BEST OLD CLASSICAL SONGS !

विनोदी, गंभीर, खेळकर आणि हलकीफुलकी अशी सगळ्या प्रकारची गाणी किशोरकुमारने गायिली आहेत. काही गाणी जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी आहेत. काही गंभीर करणारी आहेत. त्यातील काही गाणी फक्त वानगीदाखल सांगतो. कोरा कागज मधील ‘ मेरा जीवन कोरा कागज..’, ‘ जिंदगी का सफर..’ हे सफरमधील गीत, चोर मचाये शोर मधील ‘ घुंगरू की तरहा..’, इम्तिहान मधील ‘ रुक जाना नही..’ किंवा ‘ जिंदगी के सफर मी गुजर जाते है..’ हे आप की कसम मधील गीत. ही गाणी किशोरकुमार गंभीर गाणी पण तेवढ्याच सहजतेने गाऊ शकतो याची साक्ष देतात. त्याची लता मंगेशकर, आशा भोसले यांच्यासोबतची अनेक द्वंद्व गीते आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत.

किशोरकुमारच्या सगळ्या गाण्यांचा परामर्श या लेखात घेणे अशक्य आहे. किशोरकुमार हा मुळचा मध्य प्रदेशातील खांडवा या गावाचा. अशोक, अनुप यांचा धाकटा भाऊ. त्याने आपल्या आयुष्यात चार लग्ने केली. आणीबाणीच्या काळात जाहीरपणे विरोधात बोलल्याने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्याच्यावर इन्कम टॅक्सची धाड घालण्याचा आदेश दिला असे म्हटले जाते. त्यात तो कफल्लक झाला. पुन्हा देशात व परदेशात स्टेज शो करून त्याने अफाट पैसा कमावला. या सगळ्या गोष्टींशी त्याच्या चाहत्यांना काही देणेघेणे नाही. किशोरकुमारकडे ते एक महान गायक म्हणूनच पाहतात. तो आज जरी आपल्यात नसला तरी त्याच्या गाण्यांच्या रूपाने तो अजरामर आहे. ‘ वो आज भी करीब है..’



# आनंदी पहाट

## आपले आयुष्य इतरांपेक्षा निराळे असावे

आधुनिक केसरी

मानसिक स्वास्थ्य टिकवल्यावर आपल्या अंतरंगात प्रसूत होणारा आनंद निरंतर राहतो. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरे तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो? ते अवलंबून असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दैनंदिन आयुष्यांत स्वतःच्या अशा कितीतरी प्रकारच्या, आपले जीवन जगण्याच्या, नवनवीन कल्पना आपल्या मनांत असतात. प्रत्येकालाच असे वाटत असते कि, आपले आयुष्य इतरांपेक्षा निराळे असावे. जगाने कौतुक करावे असेच आपले जीवन असावे, आपल्या प्रत्येक बाबतीत काही-ना-काही वेगळेपण असावे. आपण बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा स्विकार करावा लागतो. आपल्यापैकी अनेकांना त्यांच्यात असलेल्या उणिवांच्या जाणिवाच होत नाहीत. खरे तर आपल्यातल्या उणिवा दूर करून जाणीवा जपण्याची जरुरी असते आणि जपलेल्या जाणिवांना नेणीवेपर्यंत घेऊन जाण्याची जरुरी असते, हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.

अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटली जात असतो, अगदी न कळत होत असते तसे. दिवसभरांत एकूण सत्तर ते बहात्तर हजार विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचे विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झाले आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असे नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसे बघितले तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असे नाही. ह्या जगात विचार नाहीत असा प्राणी नाही. अनेकदा आपल्या विचारांचा संबंध सभोवताली घडत असलेल्या घटनांशी असतो. हे विचार कधी व्यक्तिगत तर कधी इतरांशी संबंधित असतात.

संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-34

# गरज आहे का?

आधुनिक केसरी

सगळे नेहमीच म्हणतात की माणसाला जगण्यासाठी असं लागतं तरी किती? अंगभर कपडा पोटभर जेवण राहायला घर असलं की पुरे. असं म्हणतात खरं. पण कालांतराने आपल्या गरजा वाढत जातात .मोठा बंगला हवा असतो. छान कूलर एसी मोठा टीव्ही डबल फ्रिज सर्व सुविधायुक्त. घरात महागड्या वस्तू पाहिजे असतात. या सगळ्या गोष्टींची गरज नसते .या चैनीच्या वस्तू आहेत .मग त्या विकत घेता येत नाही तेव्हा काहीतरी उलट-सुलट भानगडी केल्या जातात. त्यात चांगला सभ्य माणूस पडतो .पैसा मिळवण्यासाठी काय काय करावे लागते हे जर मुलांनी लहानपणी पाहिले, तर तसेच संस्कार त्यांच्यावर होतात. मग कधी कधी बेटा बाप से सवाई वर कमाई निघतो. हे संस्कार नको आहे मुलांवर. त्यांना फक्त कष्टाचे पैसे कमवायची सवय लावूया. काहींना हा वेडेपणा वाटेल. वाचून सोडून देतील. लिहिणाऱ्याला वेड्यात काढतील. पण हेच शाश्वत सत्य आहे. कष्टाची कमाई असेल तर सुखाची झोप येते. नाहीतर रात्रभर डोळ्याला डोळा लागत नाही. कुठे काय ठेवले याची चिंता असते. ते सुरक्षित राहील का? जीवाला धोका तर होणार नाही ना? त्याच्या कडे ठेवले तो परत देईल का? पळून जाईल का? बदलेल का? अशा नाना विचारांनी डोके गरगरते. इतका विचार करून डोक्याचं खोकं करण्यापेक्षा थोडासा शांत चित्ताने विचार करू. याची खरंच आपल्याला गरज आहे का? वाजवीपेक्षा जास्त असं कशासाठी कमवायचे? तारुण्यात कमवायचे आणि उतारवयात गमवायचे. तब्येत ढासळते म्हणून औषध उपचारासाठी पैसे लागतात. त्यापेक्षा आपल्या गरजा कमी ठेवून खर्च कमी करून मुलांना सुद्धा अशाच आदर्श सवय लावू . त्यांना आपण लावू तशा सवयी लागतात...

# हर घर तिरंगा

आपल्या भारत देशाला स्वतंत्र मिळून आज बरोबर पंचात्तर वर्ष पूर्ण झालेत म्हणून सध्या बघायला मिळत आहे प्रत्येक गाव असो किंवा शहर अगदी छोट्या खेड्यात सुद्धा हर घर तिरंगा अभियान राबवल जात आहे पांच दिवस आधीपासून सुचना दिल्या जात आहेत की प्रत्येक व्यक्तिने आपल्या घरावर तिरंगा झेंडा लावावा तेरा तारखेला सकाळी लावावा तर पंधरा तारखेला संध्याकाळी काढ़ावा आणि तों झेंडा कापड़ी असावा प्लास्टिकचा नसावा तों झेंडा पडणार नाही फाटनार नाही याची पुरे पुर काळजी घ्यावी छोटासा का होइना आपल्या घरावर तिरंगा लाऊंन आपणही हयाँ हर घर तिरंगा अभियानात सामिल होऊन हा स्वतंत्र दिन साजरा करुया जर तिरंगा झेंडा कुठे रस्त्यात आढळला तर त्याला सम्मानान घरी घेऊन जाव आणि त्याला सलामी द्यावी प्रत्येक व्यक्तीने निदान स्वतंत्र दिनाच्या दिवशी तरी आपल्या व्हाट्सअप डीपी वर तिरंगा झेंडाचा फोटो ठेवावा असे आवाहन करण्यात आले आहे पण काही लोकांना तेवढा सुद्धा वेळ नसतो असे म्हणतात झेंडा लावायला कितकासा वेळ लागतोय अरे ते सैनिक आपल्या जीवाची पर्वा न करता सीमेंवर लढतात आपल्या देशाच्या रक्षणासाठी आणि तुम्ही साधा झेंडा लाउ शकत नाही एवढ तर नक्कीच करू शकतों ना आपण माझ्या मते आताच नाही तर येणाऱ्या प्रत्येक स्वतंत्र दिन असो किंवा प्रजासत्ताक़ दिन हे अभियान क़ायमस्वरुपी लागु करायला हवे यावर्षी स्वतंत्र दिवसाची खूपच आधीपासून तयारी होतांना दिसतेय शाळा, कॉलेज, इंग्लिश मेडियम मध्ये वेग वेगळे संस्कृतिक़ कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे ज्यात देशभक्ति गीतांनवर नृत्य, गायन, व्यसनमुक्तिवर नाटक लहान असो किंवा मोठे कोणीच मागे राहिलेल दिसत नाहीये पंधरा अगस्टला तर लहान मुलांचे पोशाख बघून अगदी भूतकाळात गेल्यासारखे वाटते गांधीजी, तर कोणी, जवाहरलाल नेहरू, सर्व जाती धर्मतील पेहराव ही बालक मोठ्यांना सुद्धा एकात्मतेचा संदेश देतात

**-कविता चव्हाण, जळगाव**

# “निरुपण”

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**आपत्सु मग्नः स्मरणं त्वदीयं**
**करोमि दुर्गे करुणार्णवेशि ।**
**नैतच्छठत्वं मम भावयेथाः**
**क्षुधातृषार्ता जननीं स्मरन्ति ॥१०॥**

दुर्गे माते ! हे करुणासिंधु माहेश्वरी ! जेव्हा मी संकटात सापडतो तेव्हाच मी तुझे स्मरण करतो. हे माझे शाठ्य समजू नकोस, कारण भुकेलेल्या आणि तहानलेल्या मुलाला आईची आठवण येते. || १० || जगदम्ब विचित्रमत्र किं परिपूर्णा करुणास्ति चेन्मयि। अपराधपरम्परा परं न हि माता समुपेक्षते सुतम् ॥११॥ मत्समः पातकी नास्ति पापघ्नी त्वत्समा न हि। एवं ज्ञात्वा महादेवि यथायोग्यं तथा कुरु ॥१२॥ जगदंबे ! माझ्यावर तुझी पूर्ण कृपा आहे, यात आश्चर्य ते काय? कारण मुलगा अनेक अपराध करतो तरी आई त्याची उपेक्षा करीत नाही. || ११ || हे महादेवी ! माझ्यासारखा पापी नाही आणि तुझ्यासारखी पापनाशिनी नाही. असे जाणून जे योग्य असेल ते कर. || १२ ||

# ।। दासबोध स्तवन ।।



## सृष्टीकथन

आधुनिक केसरी

खरे तर समर्थानी या ठिकाणी समाजातल्या दंभाचारावल कोरडे ओढले आहेत. ते कसे कल्पनेचा देव कधी घरीच हरवतो. कधी चोरला जातो. तर कधी, समाजातील दुष्ट माणंसं जबरदस्तीने तोडून मोडून टाकतात. कोणी देवाला भ्रष्ट करते तर कोणी पाण्यात टाकतात. कोणी पायाखाली तुडवतात. दुष्ट माणसे देवस्थान, तिर्थक्षेत्र उध्वस्त करून टाकतात. एक देव सोनार तयार करतो. एकदेव ओतारी मुशींत ओतून तयार करतो. एक देव दगडापासून पाथरवट तयार करतो. नर्मदा व गंडकी नदीच्या काठावर लाखोदेव पडलेले दिसतात. त्यांची मोजदाद करता येणे शक्य नाही. बाण,तांदळे,तांब्याची नाणी,स्फटिक अशा देवांची देखील ,पूजा केली जाते. हा सगळा मायेचा पसारा आहे प्रारब्दानुसार आपल्याला सुखदुःख भोगावे लागते. हे मात्र कायम लक्षात ठेवावे. साधुसंत थोर अनुभवी महात्मे या सर्वाचा अनुभव असाच आहे की खरा देव पंचभूतांच्या पलीकडे आहे आणि द्रुष्यस्रुष्टी मिथ्या आहे. विश्व निर्माण होण्यापूर्वी, विश्वचालू असताना आणि विश्वाचा शेवट झाल्यावर शाश्वत देव जशाच्या तसाचं असतो. तो आरंभी आणि शेवटी कायम रहातो. सर्व स्वानुभवी पुरूषांचा असाचं निश्चय आहे याबद्दल त्यांना मुळीच शंका नाही. अन्वय आणि व्यतिरेक दोन्ही कल्पनामय आहेत।



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जिकडे पहावे तिकडे सगळ्या द्रुष्य विश्वामध्यें आत्मस्वरूपचं भरलेले आहे अशा पध्दतीने विचार वापरणे हा अन्वय होय. तर जे जे द्रुष्य आहे ते कल्पनेत येऊ शकते मनास भासते,बुद्धीने ग्रहण होऊ शकते. ते ते सगळे अनात्म असल्याने त्याचा निरास करून जे केवलरूपाने शिल्लक उरतें ते आत्मस्वरूप समजावे. अशा पध्दतीने विचार वापरणे हा व्यतिरेक होय. कल्पना कोणत्या स्रुष्टी निर्माण करतात. मुळात कल्पना एकच असते. पण तिच्या खटपटीने आठ प्रकारच्या स्रुष्टी जन्म पावतात.

1)कल्पना 2)शब्द 3)प्रत्यक्ष स्रुष्टी 4)चित्रलेप स्रुष्टी म्हणजे कागद, कापड,लाकुड, भिंत, यावर रंगाचे लेप लावून केलेली स्रुष्टी 5)स्वप्न स्रुष्टी 6)गंधर्व स्रुष्टी आकाशात दिसणारे वेगवेगळे देखावे 7) ज्वर स्रुष्टी अंगात ताप चढल्यावर होणारा भ्रम. 8) नजरबंदीपासून दिसणारी स्रुष्टी कल्पनेपासून निर्माण होणाऱ्या स्रुष्टींचे हे आठ प्रकार आहेत. आता आपण ठरवू शकतो कोणती श्रेष्ठ आणि कोणती कनिष्ठ किंवा दोन्ही पण नाही. वरील सर्व विवेचनाचा समारोप करताना स्रुष्टी मिथ्या खरी पण खरे देवाचा अनुभव येण्यास तिचा उपयोग करून घ्यावा.

# देहाचे भोग आणि आनंद

आधुनिक केसरी

तुम्हाला आपल्या हिताकरीता दुसऱ्याच्या उपयोगी पडणे जरुर आहे. तुम्ही असे नाही म्हणता कामा की, परमात्म्यानेच याला अशा स्थितीत ठेवला आहे, त्याच्या विरुद्ध कसे जावे ? तुम्हाला परमात्म्याच्या विरुद्ध जाणे शक्यच नाही. पण आपल्या हिताकरीता, म्हणजे आपली देहबुद्धी कमी होण्यासाठी, दुसऱ्याच्या उपयोगी पडणे जरूरी आहे. जसे लहान मुलांना खाऊ वगैरे दिला म्हणजे घरच्या यजमानाला पोहोचतो, तद्वत लोकांच्या उपयोगी पडले म्हणजे परमात्म्याला पोहोचते.

परमात्म्याने पाठवलेली दुखणी, संकटे, यांत आनंद मानला पाहिजे. एखाद्या आजारी माणसाची देहकष्ट घेऊन शुश्रूषा करायला मी जर सांगितली, तर ते काम तुम्ही आनंदाने कराल. सदगुरुंनी आपल्याला हे काम सांगितले याचा आनंदच वाटेल. मग परमात्म्याच्या इच्छेने येणारी दुखणी, संकटे यांचाही तुम्ही का नाही मानू आनंद ? पण परमात्मा आपला सर्वस्वी हितकर्ता आहे असा तुमचा विश्वास आहे कुठे ? परमात्म्यानेच धाडलेली संकटे त्यालाच दूर करायला कशी सांगावीत ? दुसरे असे की भोग हा भोगलाच पाहिजे. आता जर भोगला नाही, तर पुढे तरी भोगावा लागणारच ना ?



देह सुस्थितीत असला म्हणजे देहाचा विसर पडतो असे तुम्ही म्हणता; पण तुम्हाला देहाचा असा विसर कधीही पडत नाही. त्याची आठवण सामान्यपणे असतेच. दुखणे वगैरे आले म्हणजे ती विशेषपणे भासते इतकेच. दुखणे आणि त्याचे दुःख ही दोन निराळी असल्यामुळे, दुखणे आले तरी मनुष्याला आनंदात राहता येईल. ज्याच्याजवळ भगवंत असेल त्यालाच आनंदाचे जगणे प्राप्त होईल; म्हणून ज्याला आनंदात जगायचे आहे त्याने नाम घ्यावे, आणि भगवंताच्या अनुसंधानात राहावे.

अनुसंधान कशाला म्हणावे ? उठणे, बसणे, जप करणे, गप्पागोष्टी करणे, चेष्टा-मस्करी करणे, वगैरे क्रियांमधे भगवंताशी संबंध आणि संदर्भ असावा, हेच अनुसंधान. भगवंताचे अनुसंधान आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. 'मी अनुसंधान टिकवीन' असा मनाचा निश्चय करावा. जगाच्या प्रवाहात उलट पोहणे म्हणजे भगवंताचे अनुसंधान टिकवणेच होय. भगवंताचे होऊन प्रपंच करणे ही सर्वश्रेष्ठ कला आहे. भक्ताला ही कला अवगत झाल्याने भक्त भगवंतमय होऊन त्याला सर्व जगतात आनंद दिसतो.

आजचे बोधवचन : देहाची सुखदुःखे प्रारब्धावर टाकू या आणि नामस्मरण प्रयत्नाने व प्रेमाने करूया.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# बनावट कबाला पत्रक व शासकीय दस्तावेज तयार केल्याबाबत गुन्हा दाखल

## तत्कालीन ग्रामविकास अधिकारी व उपविभागीय कार्यालय पैठण येथील एजंटांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील बिडकिन येथील सोनवणे गल्ली येथे असलेल्या सरकारी विहिरीच्या (बारवाच्या) पुर्व दिशेला असणारे जोत्याच्या ३० फुट बाय ५० फुट अशी १५०० चौरस फूट जागेचा बनावट कबाला पत्रक व शासकीय दस्तावेज बनविल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिसांनी दिलेली सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी शेख अहमद शेख उस्मान, वय ४९ वर्षे, रा.सादातनगर, बिडकिन यांनी समक्ष पोलिस ठाणे येथे हजर राहून जबाब दिला कि, बिडकिन येथील सोनवणे गल्ली येथील सरकारी विहिरीच्या (बारवाच्या) पुर्व दिशेला असणारे जोत्याच्या ३० फुट बाय ५० फुट अशी एकूण १५०० चौरस फूट जागेचा बनावट कबाला पत्रक व शासकीय दस्तावेज बनविले होते.
बिडकिन ग्रामपंचायत कार्यालय तात्कालीन ग्रामविकास अधिकारी यांना हाताखाली धरुन नमुना नंबर ०८ ला सन २०१४ साली नोंद झालेली असुन त्याचा मिळकत क्रमांक १६७३ असा आहे. यासंदर्भात फिर्यादी शेख अहमद यांनी माहिती अधिकार कायदा अंतर्गत या नोंदीची मागणी केली असता सदरिल नोंदीची मुळ संचिकेच्या साक्षांकित प्रत आमच्याकडे उपलब्ध नाही असे लेखी कळविण्यात आले आहे. यावरुन असे स्पष्ट होते कि, कबाला पत्रक व इतर कागदपत्रे हे बनावट सही शिक्के बनवुन बनविण्यात आले आहे. व ते सर्व खोटे आहे. याप्रकरणी शेख महम्मद शेख करिम, वय ५५ वर्षे, रा.सोनवणे गल्ली, बिडकिन, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय पैठण येथील एजंट यांच्यावर साथीदार सह मिळुन बनावट सही शिक्के बनवुन सदरिल बनावट कबाला पत्रक व इतर कागदपत्रे बनविले व तात्कालीन ग्रामविकास अधिकारी यांना हाताखाली धरुन ग्रामपंचायत कार्यालयात रॅकॉर्डला स्वतःच्या नावे करुन घेतल्या बाबत मा.पोलिस अधिक्षक यांच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
यावेळी बिडकिन येथील गावठाण मधील सार्वजनिक जागेचे खोटे व बनावट दस्तऐवज बनवून सरकारी जागेवर अनधिकृतपणे कब्जा केल्याप्रकरणी व बिडकिन ग्रामपंचायत कार्यालय चे तात्कालीन ग्रामविकास अधिकारी व उपविभागीय अधिकारी कार्यालय पैठण येथील एजंट यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० नुसार ४२०,४६५,४६८,४७१ यानुसार गुन्हा दाखल केला असून शेख महम्मद शेख करिम यास ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच तात्कालीन ग्रामविकास अधिकारी सारंगधर लोढे यांना रात्री उशिरा ताब्यात घेण्यात आले असुन उपविभागीय अधिकारी कार्यालय पैठण येथील एजंट यांची शोधाशोध सुरू असुन लवकरच त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे संकेत आहे.




औरंगाबाद : महानगरपालिका प्राथमिक शाळा एकनाथनगर येथे अन्नक्षेत्र च्या वतीने मुलांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संतोष वसंतराव तपकिरे, अन्नक्षेत्रचे मराठवाडा प्रमुख तथा दै. आधुनिक केसरीचे सरव्यवस्थापक विभाकर खांदेवाले, डॉ. प्रभू गोरे, राजू गायकवाड, सहशिक्षक अर्चना मोहिदे, विद्या बुलबुले, उर्मिला भालेराव, मंगल पगारे, सुभाष शिंदे, गायत्री जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांना अन्नाचे महत्त्व पटवून दिले. वैशाली गुळवे यांनी सुत्रसंचालन केले. संतोष तपकिरेंनी आभार मानले.



# श्रीक्षेत्र गवळीशिवरा येथे महारुद्राच्या दर्शनाला तब्बल एक लाख भाविकांची मंदियाळी

## टायगर ग्रुपच्या वतीने दाळबट्टीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील गवळीशीवरा येथील महारुद्र हनुमानाच्या दर्शनसाठी तिसऱ्या श्रावणी शनिवारनिम्मित तब्बल एक लाख भाविक भक्तांनी दर्शन घेतले.
लासूर स्टेशन, गाजगाव, शिल्लेगाव, नांगरे बांभुळगाव, धामोरी, सावंगी, सुलतानाबाद, पोळ रांजनगाव सह पंचक्रोशीतील भाविक पायी श्रावण महिन्यात महारुद्र हनुमानच्या दर्शनाला पहाटेपासून येतात मात्र आज तिसऱ्या शनिवारी रेकॉर्डब्रेक गर्दी दर्शनासाठी भाविकांनी गवळीशिवरा येथे केली होती. दरम्यान लासूर स्टेशन येथील टायगर ग्रुपच्या वतीने दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी डालबट्टीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादचा लाभ घेतला. यावेळी टायगर ग्रुपचे सुरेश साळुंके, प्रशांत जैन आदिसह टायगर ग्रुपच्या सदस्याची उपस्थिती होती.

**गवळीशिवरा येथील महारुद्र मारुती नवसाला पावणारा असल्याने अनेक भाविक नवस बोलतात व नवस पूर्ण झाल्यावर फेडण्यासाठी हजारो भाविक येत असतात. मात्र श्रावण महिन्यात भाविकांची रिघ लागते. आज तिसऱ्या शनिवारनिम्मित रेकॉर्ड ब्रेक भाविकांनी महारुद्रचे दर्शन घेतले. मागील दोन वर्ष कोरोनोकाळामुळे दर्शनास येणाऱ्या भाविकांची गर्दी रोडवली होती मात्र आत्ता पूर्ण परिस्थिती पूर्वपदावर आल्याने आज लाखो भाविकांनी दर्शन घेतले.**
**नागेश पोळ (पुजारी)**

# शिल्लेगाव पोलिसांनी जप्त केलेला तब्बल बारा लाखाचा मुद्देमाल केला परत

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील सिल्लेगाव पोलिसांनी विविध गुन्ह्यात हस्तगत केलेला 11,91,000/- चा किमती मुद्देमाल पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांचे हस्ते परत दिल्याने फिर्यादीनी शिल्लेगाव पोलिसांचे आभार मानले आहे.
दि. 13 ऑगस्टला पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांचे हस्ते संपूर्ण जिल्ह्यातील किमती मुद्देमाल फिर्यादीना परत दिला आहे त्यामध्ये पोलिस स्टेशन सिल्लेगाव येथील सर्वत जास्त 15 गुन्ह्यातील तब्ब्ल बारा लाखाचा किमती मुद्देमाल होता तो परत देण्यात आला.
या मुद्देमालामध्ये प्रकाश यशवंत उबाळे रा. वरखेड यांना मारहाण करून जबरी चोरी करून सोन्या चांदीने दागिणे मनिमांगल सूत्र, डोरले, कानातील झुमके इत्यादी चोरून नेले होते ते पोलिस यांनी हस्तगत करून त्यना आज रोजी परत केले आहे.
तसेच वाल्मीक दिवेकर रा. लासुर स्टे यांच्या आईचे गळ्यातील पोत -28 सोनीचे मनी चोरट्यानी हिसकावून घेतली होती ती त्यांचे मुलास परत केली आहे अंबादास जिवरग यांचे जोडवे तसेच चोरीस गेलेले मुद्देमाल मोटार सायकल- 7, शेतकरी यांचे पाण्यातील मोटारी, घरफोडी तील मोबाईल असा मुद्देमाल परत केला आहे त्यामुळे त्यांचे चेहऱ्यावर अनंद पहावयास मिळाला आहे. पोलिसांनी चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करून तो पुन्हा फिर्यादी परत दिल्याने आम्हाला आनंद झाल्याचे पोलिस निरीक्षक सुरवसे यांनी सांगितले.
सदरची कारवाई मनीष कलवनिया, पोलिस अधीक्षक, डॉ. पवन बनसोडे, अपर पोलिस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली एम.टी. सरवसे पोलिस निरीक्षक, महीला पोह झकिया शेख, पोह श्रीकृष्ण दाणी, पोना उमेश गुडे, पोका संतोष सिरे, पोका बालाजी जवादे यांनी केला आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा
स्वातंत्र्य दिन
चिरायु होवो !
शिवसेना


सुरेश चव्हाण
(सामाजिक कार्यकर्ते)
घाणेगांव तांडा ता. सोयगाव

सौ.रत्नाताई सुरेश चव्हाण
सरपंच,
घाणेगांव तांडा ता. सोयगाव

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

सुरेश काळे
ग्रामसेवक
देव्हारी ग्रामपंचायत

# वृद्धाश्रमांची गरज आणि आवश्यकता किती ?



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**बऱ्याच वेळा आई ही मुली मध्ये स्वतःला पाहते. आणि जे आपल्या आयुष्यात करायचे राहून गेले किंवा खुप ईच्छा असूनही प्रचलित चालीरीतीमुळे त्यांना करायला किंवा तसे वागायला जमले नव्हते ते त्या मुलीला करायला भाग पाडतात. त्यांचेवर बऱ्याचवेळा आपली मते व आवडी लादतात. यात बदल होण्यासाठी प्रत्येक स्त्रीने दहा-दहा वर्षांच्या आयुष्याच्या टप्प्यावर आत्मपरीक्षण करावे, आत्मावलोकन करावे. वस्तुस्थितीजन्य निर्णय घेऊन विवाह संस्कार आणि महत्व याची उजळणी करताना मुलींना सुसंस्कारीत करताना काळजी घ्यावी. तसेच स्पर्धा करणे, बरोबरी करणे, तुलना करणे थांबवावे आणि आपल्या जीवनात जे आवश्यक आहे तेच करावे, तसेच वागावे. म्हणजे वृध्दाश्रमाचे आधारातून मुक्तता होवू शकते.**

भारतात ब्राम्हण समाजात, ईतर जातीपाती पेक्षा वृध्दाश्रमाची गरज वाढत चालली आहे. वृध्दाश्रमात राहण्यासाठी दाखल झालेल्या वृध्द आई बाबांना परदेशात स्थायिक व्हायला आवडत नाही. आणि इथेच स्वतःचे घरात राहायचे तर म्हातारपणामुळे कांही करणे जमत नाही. बरे मुलांना, मुलींना वाढवताना, शिकवताना, आपले जीवन जगताना, जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली राबताना राहून गेलेल्या अपेक्षा, आकांक्षा, स्वप्ने पूर्ण करायचे म्हणून मन मारून जगत, कर्ज काढून मुलामुलींचे लाड करतांना आयुष्याच्या संध्याकाळच्या यातना, वेदना, अपंगत्व ( शारिरीक आणि मानसिक) वयपरत्वे व्याधींची होणारी उत्पत्ती या सगळ्यांचा विचार करायला वेळ नसतो.

मग मुलामुलींचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळाली की आनंद होतो. परंतू त्यासाठी मुले परदेशी जातात, सुरूवातीचे कांही वर्ष सगळे सुरळीत असते. पण एकदा का त्यांची लग्ने झाली की त्यांना पंख फुटतात. मग पैशा मागे धावताना जन्मदाते ओझे वाटू लागतात. मग यातून मार्ग काढताना अशी परदेशस्थ मुले वृध्दाश्रमाचा आधार शोधतात. त्यात एकच अपत्य असेल तर मात्र ही वेळ जरा अपेक्षे पेक्षा लवकर येते.

मला वाटते यात बहूतेक वेळा आईचीच चूक असते. मुलींवर संस्कार करतांना, संसाराचे स्वप्न दाखवताना डस्टबिनची संकल्पना भिनवली जाते. मुलीच्या संसारात सासु-सासऱ्याची लुडबुड नको यावर त्या ठाम असतात. आपणही लवकरच कोणाचे तरी सासू-सासरे होणार आहोत हे त्यांचे लक्षातच येत नाही. आणि मग माझी मुलगी सुखात आहे, नवरा खूप आधर ठेवतो. कांही म्हणजे कांही माझ्या मुलीला करावे लागत नाही. असे तोंड भरून कौतुक करताना आया थकत नाहीत. पण त्याच वेळी सुनेचा विषय निघाला की लगेच आईचा नूर बदलतो. सासू संचारते आणि मग सुरू होतो सुनेचा उध्दार. ओहो काय सांगू माझी सून प्रचंड आळशी आहे. सगळ्या कामाला बाई लावली आहे. एकाही कामाला हात लावत नाही. माझा मुलगाच बिचारा सगळं करतो. सांभाळुन घेतो तीला. फार ऐदी आहे हो सुन. हा फरक का पडावा. हा वैचारिक भेद का? पण याला नाईलाज आहे. हे पिढ्यानपिढ्या असेच चालू आहे. याला अपवाद असतात पण ते नगण्य असतात.

बरे यात समजून ही बाबा कांहीच भुमिका घेऊ शकत नाहीत. बहूतेक घरात सुनेचे सासऱ्याशी बऱ्यापैकी जमते, सासुशी नाही. म्हणून महिलाच महिलेच्या दुष्मन असतात असे नाईलाजाने म्हणावे लागते.

बऱ्याच वेळा आई ही मुली मध्ये स्वतःला पाहते. आणि जे आपल्या आयुष्यात करायचे राहून गेले किंवा खुप ईच्छा असूनही प्रचलित चालीरीतीमुळे त्यांना करायला किंवा तसे वागायला जमले नव्हते ते त्या मुलीला करायला भाग पाडतात. त्यांचेवर बऱ्याचवेळा आपली मते व आवडी लादतात.

यात बदल होण्यासाठी प्रत्येक स्त्रीने दहा-दहा वर्षांच्या आयुष्याच्या टप्प्यावर आत्मपरीक्षण करावे, आत्मावलोकन करावे.

वस्तुस्थितीजन्य निर्णय घेऊन विवाह संस्कार आणि महत्व याची उजळणी करताना मुलींना सुसंस्कारीत करताना काळजी घ्यावी. तसेच स्पर्धा करणे, बरोबरी करणे, तुलना करणे थांबवावे आणि आपल्या जीवनात जे आवश्यक आहे तेच करावे, तसेच वागावे. म्हणजे वृध्दाश्रमाचे आधारातून मुक्तता होवू शकते.

ब्राह्मण समाज स्वतःला बुध्दीवादी आणि सुधारीत विचारसरणीचा समजतो. तसेच जगराहटीत करावे लागणारे बदल लवकर आत्मसात करतो. त्यात भारतातील आरक्षणाचा अतिरेक ही याला बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. भारतात लायकी, विद्वत्ता,



क्षमता, याचा विचार होऊन नोकऱ्या मिळणे बंद झाले आहे. ईथे आरक्षणातून कोटा पूर्ण करण्याची पध्दत राजकीय रेट्यामुळे आणि मतांच्या लालचीने राबवली जाते. परिणामी अनेक महत्वाच्या पदांवर नालायक किंवा कुवत, क्षमता नसलेले लोक जातीव्यवस्थेमुळे आरक्षणाचे नावाखाली बसवले जातात. यामुळे ब्राम्हण समाजातील असंख्य लायक आणि हुशार मुलामुलींना येथे नोकऱ्या मिळत नाहीत. ते परदेशात जॉब शोधतात, स्विकारतात.

कारण परदेशात टॅलेंट पाहून, लायक लोकांनाच नोकरीसाठी निवडतात कारण ते पगारही तसाच गलेलठ्ठ देऊ करतात. आणि भारतीय हुशार मुलंमुली एकदा जॉईन झाली की पगाराच्या पाचपट कामे करून घेतात.

वर्कफ्रॉम होममुळे तर या दोन तीन वर्षात सकाळी साडेआठ ते रात्री अमर्याद वेळेपर्यंत कामे करून घेतात. पण पगार, संसाराच्या गरजा, वाढत्या अपेक्षा आदींची मिळवणी करण्यात सगळेच ढोरमेहनत करत राहतात. कारण आहे स्पर्धा. थोडा जरी हलगर्जीपणा दाखवला तर स्पर्धक ढीगाने उपलब्ध असतात. मग या पैशाचे मागे धावण्याचे शर्यतीत नाती ओझे बनत चालली आहेत. जन्मदातेच अडचण ठरतात. आणि मग वृध्दाश्रम आठवतो.

बरे भारतीय रुपया सतत डॉलर च्या तुलनेत घसरत राहतो त्यामुळे भारतीय रूपयातील पगार तुटपुंजा वाटत राहतो. जेंव्हा पैसा सर्वस्व ठरतो तेंव्हा नाती हद्दपार होतात. हे जग ज्यांचे मुळे पाहायला, अनुभवायला मिळाले, तसेच ज्यांनी खस्ता खाऊन, प्रसंगी अर्धपोटी राहून, स्वतःच्या गरजा आणि अपेक्षा सीमित ठेऊन ज्यांनी वाढवलं तेच अडगळ, अडचण, आणि ओझे होतात. यात कुठेतरी संस्काराचा, सभोवतालच्या वातावरणाचा, वाढत असताना दिसलेल्या पैशाच्या अवास्तव महत्त्वाचा तो परिणाम असतो. त्यामुळे पिढीदरपिढी हे चालत असलेले रितीरिवाज , अवास्तव आणि अनावश्यक अपेक्षा यांना आई बाबांनी आळा घातला पाहीजे. नाही तर मुलीचे संसारात आणि सुनेच्या संसारात होणाऱ्या मुल्यमापनाचे चुकीमुळे आई बाबांवर वृध्दाश्रमात आयुष्याची संध्याकाळ काळोख पडून रात्र होई पर्यंत जगत राहावे लागेल.

हे टाळण्यासाठी शिक्षण पध्दतीत, अभ्यासक्रमात, विषयांमध्ये, बदल करणे गरजेचे आहे.

मागास जाती जमातीला मुख्य प्रवाहात येण्यासाठी आरक्षण गरजेचे आहे पण त्याचा अतिरेक नको, महत्वाच्या, धोरणात्मक निर्णय घ्यावे लागणाऱ्या उच्च पदांवर आरक्षण विरहीत लायक उमेदवारांचीच निवड व्हायला हवी. पुरेसा पगार आणि महागाईवर नियंत्रण, तसेच उपजिवीकेच्या वस्तु पदार्थ, अन्नधान्य यांचा सुकाळ असावा, कृत्रिम टंचाई, अकारण भाववाढ या बाबी देशातील सर्व नागरिक परिवारातील सदस्य आहेत ही भावना रुजवली गेली तरच होणार नाहीत.

एकत्र कुटुंब पध्दतीचे महत्व, जीवनात सभोवताली वावणाऱ्या नातलगांची उपस्थितीचे महत्व जोपासले गेले तर माणूस एकलकोंडा होणार नाही. कुपमंडूक वृत्ती झिडकारून विशाल वैचारिक बैठक हवी. हे घडण्यासाठी स्वतःत बदल करायला सुरूवात केली तर भारत सुजलाम सुफलाम होण्यास वेळ लागणार नाही. आणि वृध्दाश्रमे फक्त आणि फक्त आधारहीन, बेवारस, गरजू लोकांसाठी असावीत. वृध्दाश्रम हा व्यवसाय नको व्हायला. ती सेवाभावी आणि माणूसकी जपणारीच संस्था असावी.

# ...राया जतन करिता कष्ट



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना आपणास अत्यानंद होणे साहजिक आहे. कारण आपणास मिळालेले हे स्वातंत्र्य सहज किंवा सोप्या पद्धतीने मिळाले नसून, त्यासाठी फार मोठा संघर्ष आपल्या पूर्वजांना करावा लागला आहे, प्रसंगी प्राणाची आहुती द्यावी लागली आहे. अनेक निरपराध लोकांचा स्वातंत्र्य प्राप्तीसाठी बळी गेला तेव्हा कुठे हे स्वातंत्र्य आपणापर्यंत येऊन पोहोचले आहे. स्वातंत्र्य मिळवणे जेवढे कठीण होते तेवढेच ते स्वातंत्र्य टिकून ठेवणे देखील कठीण आहे, याची मात्र आपणास जाणीव असत नाही.**

संत ज्ञानेश्वरांनी झेंड्याच्या संदर्भात तेराव्या शतकामध्ये फार सुंदर वर्णन केले आहे. ते म्हणतात, पाहे पा ध्वजेचे चिरगुट | राया जतन करिता कष्ट | तैसा मी एक पतीत | परी तुझा मुद्रांकित || म्हणजे ध्वजाचे कापड साध्या कपड्याचे असले तरी, ध्वज साधारण नसतो. कारण त्यावर राजमुद्रा उमटलेली असते. तुम्ही आम्ही सर्वांनी हा ध्वज आपल्या अस्मितेचे, अस्तित्वाचे आणि एकूणच जीवन व्यवहाराच्या प्रक्रियेचे एक आदर्श प्रतीक म्हणून स्वीकारलेले असते. भारतीय तिरंगा ध्वज स्वीकारत असताना संविधान सभेने ध्वजाच्या संदर्भात काही नियम तयार केले होते. त्याचे आजही आपण काटेकोरपणे पालन करत असतो. कारण हा ध्वज भारतीय एकसंघ राष्ट्राचे इथल्या जनमानसातील सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक संचिताचे प्रतीक म्हणून आपण त्याचे पालन करत असतो.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या ध्वजास अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जन्मलेल्या पिढीला स्वातंत्र्य कसे मिळाले याची म्हणावी तेवढी जाणीव नाही. आपापल्या नित्य आणि नैमित्तिक कामामध्ये आपण गुरफटून गेलो आहोत. फक्त स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण भारतीय स्वातंत्र्य, तिरंगा ध्वज, क्रांतिकारक यांचे स्मरण करत असतो; परंतु ज्यांनी हा देश स्वतंत्र व्हावा म्हणून घरावर तुळशीपत्र ठेवून, प्रसंगी सर्वस्व अर्पण करून स्वातंत्र्यसंग्राम चळवळीत सामील झाले त्यांच्या विषयीचा कृतज्ञ भाव कायम स्मरणात ठेवण्याची नितांत गरज आहे. कारण स्वातंत्र्य हे एक चिरंतन मूल्य आहे, शाश्वत मूल्य आहे. काही मूल्य काळानुरूप बदलत जाणारी असली तरी प्रेम, दया, करुणा, स्वातंत्र्य ही अशी मूल्ये आहेत, जी आपण प्राणपणाने जपली पाहिजेत. अलीकडच्या काळात जी अनागोंदी आपण पाहत आहोत त्यामागे मानवी मनातील दया, प्रेम, क्षमा कमी होण्यामुळे आजचे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत. स्वातंत्र्य हे मूल्य आपणास केवळ आपले वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राहावे आणि इतरांच्या स्वातंत्र्यावर आपण गदा आणली तरी चालते अशा प्रकारचे मूल्य नसून सर्वांचेच स्वातंत्र्य मौल्यवान




आहे, हा भाव स्वातंत्र्य या शब्दातून व्यक्त होतो.

भारत सरकार हर घर तिरंगा हा उपक्रम यानिमित्ताने राबवत आहे. कारण यामधूनच आपणास आपल्या प्रतिकांविषयीची आस्था, आपलेपण आणि त्या मागची पार्श्वभूमी लक्षात येईल. हर घर तिरंगा हा उपक्रम अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे, याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. फक्त प्रश्न एवढाच आहे की प्रत्येकाने आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवत असताना ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. आपल्या वर्तनातून, कृतीतून अथवा जाणते अजाणतेपणे तिरंगा ध्वजाचा अनादर होईल, अशा प्रकारचे वर्तन कोणीही करू नये. देशातील सर्व शाळा महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रनिष्ठा या गोष्टींची शिकवण मिळावी, बालवयातच त्यांच्यावर राष्ट्रीय स्वरूपाच्या संस्काराचे बिजारोपण व्हावे या उद्देशाने हा उपक्रम आपण राबविला पाहिजे. कारण संस्कार ही काही एका दिवसात पूर्ण होणारी गोष्ट नसून, सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया आहे. इंग्रजांनी भेदनीतीचा वापर करून अखंड भारताचे दोन तुकडे केले हे आपणा सर्वांनाच ज्ञात आहे. त्यामुळे भेदनीतीने आपले किती आणि कसे नुकसान होऊ शकते हे आपण अनुभवले आहे. आज-काल समाजात सामाजिक दुही माजविण्याचे हर तऱ्हेचे प्रयत्न होत असताना आपण एक सुजाण आणि सजग नागरिक म्हणून अशा गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, समानता, सर्वांचेच स्वातंत्र्य या मूल्यांचे बिजारोपण अगदी बालवयापासून बालकांच्या मनावर केले तर निश्चितच भविष्यात त्यास चांगले फळे येतील. एवढेच नाही तर जी काही मंडळी आज पदभ्रष्ट, पथभ्रष्ट आणि डळमळीत स्वरूपाची आहे, त्यांना देखील योग्य मार्गावर येण्यासाठी हर घर तिरंगा या उपक्रमातून निश्चितच मार्गदर्शन मिळू शकते. अतिशय दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशातील भारतीय माणूस आणि कोणत्याही महानगरातील सुस्थितीत असलेला एखादा भारतीय माणूस यात आपणास भेद करता येणार नाही. हीच शिकवण सांप्रत सरकारने आपल्या कृतीतून देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या देशातील आदिवासी समाजातून येणारी एक सामान्य महिला राष्ट्रपती बनू शकते, यातून अगदी शेवटच्या घटकाचा देखील केलेला विचार प्रतीत होतो. हाच विचार आपणास आदर्श समाज म्हणून भविष्यात विश्वपटलावर दिसून येईल. त्यासाठी आपणास अजून बराच पल्ला गाठण्याची गरज आहे. या भारत भूमीतील सर्व लेकरे तिरंगा ध्वजाच्याखाली सुरक्षितपणे, आत्मविश्वासाने कार्यप्रवण कसे होतील याकडे येणाऱ्या काळात लक्ष देणे काळाची गरज ठरणार आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

## बोंबाबोंब कशासाठी?

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या वर्षात पंच्याहत्तर लाख लोकांना शासकीय नोकरी, देशातील अविकसित पंच्याहत्तर तालुक्यांचा एका झटक्यात विकास किंवा दुर्गम भागातील पंच्याहत्तर जिल्हे निवडून त्यांचा विकास, असे काही संकल्प येत्या काळात आपणास करता आले तर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अधिक फलदायी ठरेल. प्रत्येक भारतीय नागरिकांने हर घर तिरंगा या उपक्रमाचे काटेकोर पालन करावे आणि स्वातंत्र्य दिन आनंदात साजरा करावा. आपल्या वर्तनाने इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी तरच या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यास काही अर्थ असणार आहे.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

अभिमानाने हृदयाशी
तिरंगा आपण धरूया,
स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव
साजरा आपण करूया.

विसरु नका आपण
त्या वीरांचे बलिदान,
ज्यांच्यामुळे कायम आहे
आज या देशाची शान.

पारतंत्र्याने जखडलेल्या
बेडीतून ज्यांनी मुक्त केलं,
दूर करोनी तिमीर सारा
तेजोमय स्वातंत्र्य दिलं.

हसत मुखाने देशासाठी
फासावरती चढले,
मातृभूमीच्या रक्षणासाठी
रक्त त्यांनी सांडले.

रक्तरंजित झाली सारी
इतिहासाची पाने,
त्यांच्यामुळेच गातो
आज स्वातंत्र्याचे गाणे.

धारातिर्थी पडलेल्या
त्या ज्ञात-अज्ञात वीरांना,
प्रथम नमन करूया
आपण त्या शुरांना.

त्यांच्या पावन स्मृतीस
शब्दसुमने वाहूया,
डौलाने फडकवू तिरंगा
सलामी त्यास देऊया.

व्यर्थ न जावो बलिदान त्यांचे
हेच ध्यानी धरूया,
स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव
साजरा आपण करूया.

-ऋषिकेश बालासाहेब सुरवसे
रा. छ.संभाजी नगर सोनपेठ
मो. ८४११९४७९९६.

## मोबाईलची आरती

जय देव, जय देव, जय मोबाईल देवा
तुझाच रे महिमा, काय सांगू नवा ।। धृ ।।

तुझिया कृपेनें होई जलद संदेशवहन ।
तुझिया मधी हरपे, आमुचे देहभान ।।1।।

तुझीच रे करणी, सारे होती मोबाईलमय ।
तुझ्या नादी लागून, आम्हा सुचेना काय ।।2।।

जय देव, जय देव, जय मोबाईल देवा ।
पब्जी, व्हाट्सअप, सिनेमा नि फेसबुक ।
तूची रे मात्र वाटे, तयांना एकसुख ।।3।।

तुझ्या कृपेनें सकाळच्याला जाग ती येई ।
मग लागे व्हाट्सअप बघण्याची घाई ।।4।।


जय देव, जय देव, जय मोबाईल देवा ।
तुझ्या कृपेनें होई मनोरंजन न्यारे ।
तुला घेऊन हातामंधी,बघती तुला सारे ।।5।।


कानात वायरी घालून अनं खोचती तुला पीनं
तुझ्याच मुखावरी मात्र, होती सारे लिन ।।6।।

काय केली करणी, लोका रे मोबाईल राया L
करणी ने तुझिया, वेळ आमचा जाई वाया ।।7।।

जय देव, जय देव, जय मोबाईल देवा ।

-मनिष आहिरे






## हर घर तिरंगा...!

भारताचा तिरंगा झेंडा हा
उंच डोलाने फडकवुया,
सगळेजण राष्ट्र ध्वजाला
अभिमानाने सलामी देऊया.

केशरी रंग आहे शौर्याचा
पांढरा रंग सुख-शांतीचा,
हिरवा रंग हा समृध्दीचा
हा तिरंगा आमच्या देशाचा.

आझादी अमृत महोत्सवी
तिरंगा घरावरती लावूया,
देशाचा राष्ट्रगीत गाऊनी
झेंड्याकडे हर्षानंदाने पाहूया.



थोर हुतात्म्यांना पुण्य मिळो
त्यांनी दिले आपले बलीदान,
भारताला स्वातंत्र्य देऊन
जगामध्ये वाढविली शान.

हे ! पवित्र भारतमाता तुझे
आहे आम्हाला अभिमान,
देशासाठी राबती रातदिन
जय जवान- जय किसान...!

## पानाफुलांची जत्रा...!

पानाफुलांची जत्रा
भरते पावसाळ्यात,
पुष्पहार घालतात
लक्ष्मीआईच्या गळ्यात.

नारळ आणि नैवेदय
पानफुल वाहतात,
मोठ्या भक्तीभावाने
आईचे दर्शन घेतात.

वादयांच्या आवाजात
अंगावर चढवी साज,
सांजवेळी गावभर
मिरवी पोतराज.

जत्रा पाहण्यास साऱ्या
भक्तांचा घोळका जमतो,
पैंजण हलवून पोतराज
तालासुरात घुमतो.

पोतराज देवळापुढे
सवाल-जवाब सांगते,
पाऊस सुरु होताच
जत्रा हळूहळू पांगते...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण. मो. ९७६४३५०३७४.

## धाग्याची किंमत



राखी पोर्णिमेच्या दिवशी
दोऱ्याला किंमत किती
भाऊ बहिणीची नाती
निभावतात सर्व अशी

भेटाया जातो दूर भाऊराया
आपल्या लाडक्या बहिणीला
घेऊन सोबत साडी-चोळी
सोडूनी काम धाम काहीही

आजचा दिवस बहिणीसाठी
माझ्या सांगत असतो नेहमी
गोड-धोड भाऊसाठी करूनी
बघते वाट बहिण भावाची

बांधूनी राखी मनगटावर
घेतो भाऊही एक शपथ
करेल बहिणीची सुरक्षा
देणार नाही नात्याला तडा

भाऊ बहिणीचा हा सण
असतो महिना श्रावण
म्हणतात याला रक्षाबंधन
कडवटपणा काढूनी मनोमन

-कविता चव्हाण, जळगाव

## गणराया



होताच आगमन || गणराया तुझे
आनंदीत माझे || मन होई

अकरा दिवस || घरी तुझे स्थान
मिळे तुला मान || आरतीचा

धुपदीप असे || निरंतर घरी
तुझ्या साठी तरी || गणराया

आरत्यांनी होई || मनाला प्रसन्न
फुले तनमन || आनंदाने


मोदक नैवेद्य || प्रसाद सुंदर
वाहन उंदीर || असे छान

तुझ्या सवे गौरी || सोनपावलांनी
घरभर येते || समाधान

पुरणपोळीचे || गौरीला जेवण
ओटी भरुन || पुजा करे

चतुर्दशीदिन || येताच समीप
देऊनी निरोप || ये परत

सीमा मंगरूळे तवटे वडूज




## माझा देश

माझ्या या प्रिय देशात
विषमतेचे बीज नसावे
ऐक्याचा मंत्र जपूनी
प्रेमाचे घन बरसावे

राष्ट्राच्या स्थैर्यासाठी
कंकण बांधूया जनसेवेचें
हृदयास हृदय जोडूनी
पिकवू मळे माणूसकीचे

समतेच्या बागे मधूनी
सौख्याचा गंध दरवळावा
किर्तीचा सूर्य दिपूनी
प्रगतीचा चंद्र हसावा

जातीचे युद्ध संपूनी
शांतीचे झरे वाहो
प्रिय हा भारतदेश
विश्वात शोभूनी राहो

रविंद्र व्ही. चालीकवार,
महागाव, जि. यवतमाळ,
मो.9011559106

## चहा

सर्वांचा आवडता
मी म्हणजे चहा
चव माझी गोड
घेऊन तर पहा



लहान मोठ्यांचा
प्रिय मी भारी
पोटात गेल्यावर
येते तरतरी

पाहुणे येता घरी
होते माझी तयारी
गुणगाण गातात
पाहुणे मंडळी सारी

न होणारी कामं
होतात माझ्यामुळे
अनोळखी माणसासंगे
मैत्रीचे नाते जुळे

कप आणि बशी
माझे जवळचे दोस्त
घोट घेत सर्व म्हणतात
चहा झाला मस्त

## नारळी पौर्णिमा

आला नारळी पौर्णिमेचा सण
कोळीराजा बागडतो आनंदानं
सागराला श्रीफळ वाहत
करुनी मनोभावे पूजन

दर्याराजा देव कोळ्यांचा
सकलांचा तो रक्षणकर्ता
सदा प्रसन्न तो होतो
त्याच्या जीवनातला सुखकर्ता

नारळी पौर्णिमेचा सण
येतो मांगल्य घेऊन
खवळलेला समुद्र शांत होतो
कोळ्यांचा भक्तिभाव पाहून

सागरात होड्या सोडुनी
नित्य चाले मासेमारी
कष्टाचे चीज होऊनी
सुख नांदे त्यांच्या घरी

नारळी पौर्णिमेचा सण
भाऊबहिणीच्या बंधनाचा
बहीण भावास बांधते
धागा पवित्र रेशमाचा


## नवं असं काहीच नाही

बरेच दिवस झाले
घडले नाही काही खास
परागंदा झालेले शब्द
फिरकलेच नाहीत आसपास..
कसली कविता
आणि
कसलं काय?
नव्या कथानकातील
जुन्या प्रेयसीच्या आठवणींची साय,
उभ्या संसाराला
लाथ मारून
घटस्फोटित झालीय
काल..
बोलण्यात, वागण्यात माझ्या कुठे
तफावत आहे
ओळखीचा पुरावा नष्ट
करून जगता येत नाही
हीच तर आफत आहे

- सत्य प्रयागबाई कुटे,
चिखली, जिल्हा बुलडाणा,
मो. ९८८१३१०२५८

# ग्रेट चित्रकार पिकासो

आधुनिक केसरी



पिकासो (PICASSO) हा स्पेन या देशात जन्मलेला एक अतिशय प्रसिद्ध चित्रकार होता. त्यांनी काढलेली पेंटिंग्ज अख्ख्या जगात कोट्यावधी आणि अब्जावधी रुपयांना विकल्या जात असत!

एक दिवस रस्त्यानं जात असता, एका महिलेची नजर पिकासोकडे गेली आणि योगायोगानं त्या महिलेनं त्याला ओळखलं. ती धांवतच त्याच्या जवळ गेली आणि म्हणाली, "सर, मी आपली खूप चाहाती आहे. आपली पेंटिंग्ज मला प्रचंड आवडतात. आपण माझ्यासाठीही एक पेंटिंग तयार करून देऊ शकाल काय ?

पिकासो हसत म्हणाला, "मी इथं रिकाम्या हातानं आलोय. माझ्यापाशी कांहीही साधनं नाहीत. मी पुन्हा कधीतरी तुमच्यासाठी एक पेंटिंग नक्की बनवून देईन."

परंतू त्या महिलेनं आता हट्टच धरला. ती म्हणाली, "मला आत्ताच एक पेंटिंग बनवून द्या. पुन्हा कधी आपली भेट होईल किंवा नाही हे सांगता येणार नाही."

पिकासोनं मग आपल्या खिशातून एक छोटासा कागद काढला आणि आपल्या पेननं तो त्या कागदावर काहीतरी चित्र काढू लागला. जवळपास दहा मिनिटांमध्ये पिकासोनं त्या कागदावर एक पेंटिंग काढलं आणि तो कागद त्या महिलेला देत तो म्हणाला, "हे घ्या पेंटिंग. तुम्हाला याचे एक मिलियन डॉलर्स सहज मिळतील."

महिलेला मोठं आश्चर्य वाटलं. ती मनात म्हणाली, 'ह्या पिकासोनं केवळ 10 मिनिटांत घाईघाईनं हे एक काम चलाऊ पेंटिंग तयार केलंय आणि मला म्हणतोय की, हे मिलियन डॉलर्सचं पेंटिग आहे.' मात्र उघडपणे काही न बोलता तीनं ते पेंटिंग उचललं आणि ती मुकाटपणे आपल्या घरी आली. तिला वाटलं पिकासो आपल्याला मूर्ख बनवत आहे. ती बाजारात गेली आणि पिकासोनं आपल्यासाठी बनवलेल्या पेंटिंगची किती किंमत मिळू शकेल याची तीनं तिथं चौकशी केली. या चित्राची किंमत सुमारे दहा लाख डॉलर्सपर्यंत मिळू शकेल असं तिला जेव्हा कळलं तेव्हा, तिच्या आश्चर्याला पारावार उरला नाही.

ती धावत धावतच पुन्हा एकदा पिकासोकडे गेली आणि त्याला म्हणाली, "सर आपण एकदम योग्य सांगितलं होतं. या चित्रांची किंमत खरोखरच सुमारे दहा लाख डॉलर्स आहे."

पिकासो हसून म्हणाला, " मी तर तुम्हाला आधीच सांगितलं होतं."

ती महिला म्हणाली, "सर, आपण मला आपली शिष्या करवून घ्याल कां? मलाही पेंटिंग कसं बनवायचं ते आपण शिकवा. म्हणजे जसे तुम्ही दहा मिनिटांमध्ये दहा लाख डॉलर्सचं पेंटिंग बनवलं, तसंच मी अगदी १० मिनटांत जरी नाही तरी १० तासांत का होईना चांगलं पेंटिंग बनवू शकेन अशी आपण माझी तयारी करून द्या."

पिकासो हसतच म्हणाला, "हे जे पेंटिंग मी १० मिनटांत बनवलं आहे ते शिकण्यासाठी मला तीस वर्ष लागलेली आहेत. मी आपल्या जीवनाची तीस बहुमूल्य वर्षे यासाठी खर्ची घातली आहेत. तुम्हीही इतकीच वर्षे शिकण्यासाठी द्याल, तर तुम्हीही माझ्यासारखीच चित्रे काढं शकाल."

ती महिला अवाक् आणि निःशब्द झाली. ती पिकासोकडे नुसती पाहातच राहिली.

एक शिक्षकाला ४० मिनटांच्या एका लेक्चरसाठी जो पगार दिल्या जातो, तोच उपरोक्त कथेबद्दल बरंच कांही सांगून जातो. एका शिक्षकाच्या एका एका वाक्यामागे त्याची कित्येक वर्षांची मेहनत असते.

समाजाला वाटतं की , शिक्षकाला केवळ बोलायचंच तर असतं. त्याचाच पगार घेतात हे इतकाल्ले. इथं हे विसरून चालणार नाही की, आज जगात महत्वाच्या पदांवर जितके लोक आरूढ आहेत, त्यांच्यापैकी अधिकांश लोक कुठल्या ना कुठल्या शिक्षकांमुळेच त्या पदापर्यंत पोहोचलेले आहेत.

जर आपणही शिक्षकाच्या वेतनाला फुकटचं समजत असाल ,तर मग एक वेळ ४० मिनिटांचं प्रभावी तसंच अर्थपूर्ण लेक्चर देऊन दाखवा. आपल्याला आपली क्षमता किती आहे याची लगेच जाणीव होऊन जाईल!



## मुलांचा कलाविष्कार

सार्थक रवींद्र चालीकवार
मातोश्री विद्यालय,
महागाव, जि.यवतमाळ

# वक्तृत्वात व्हा तरबेज

आधुनिक केसरी



लक्ष्मण जगताप

विद्यार्थी मित्रहो 'वक्ता दशसहेस्रु श्रोता' असे म्हटले जाते. दहा हजारात एखादा वक्ता घडतो. वक्तृत्व ही एक सुंदर अशी कला आहे. या कलेच्या माध्यमातून तुम्ही लाखो लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवू शकता. आपले विचार आणि मत लोकांना पटवून देऊ शकता. आपल्या भाषणाने लाखोंच्या सभा गाजविलेल्या महाराष्ट्राला उत्तम वक्त्यांची खाण लाभली आहे. आचार्य प्र. के. अत्रे, प्राचार्य शिवाजीराव भोसलेपासून ते आजच्या घडीला इंद्रजित देशमुख, नितीन बानगुडे पाटील अशा अनेक पट्टीच्या वक्त्यांनी वक्तृत्वाच्या जोरावर आपली स्वतः ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

मुलांनो वक्तृत्व ही कला साध्य करण्यासाठी तुम्ही शालेय जीवनापासून प्रयत्न करा.भरपूर मेहनत घ्या. सुरुवातीला चुका होतील पण घाबरु नका.पुन्हा जोमाने प्रयत्न करा.एक दिवस तुम्ही उत्तम वक्ता व्हाल. यासाठी खालील बाबी लक्षात ठेवा.

१.भाषणासाठी छोटे छोटे विषय घेऊन न घाबरता बोलायला शिका. उदा. माझी आई ,माझी शाळा ,माझे गाव इ.

२.भाषण पाठांतरासाठी वेळ द्या.मनापासून सराव करा.

३.सुरुवातीला घरातील माणसांसमोर भाषण म्हणा.नंतर घरात आरशासमोर उभे राहून भाषणाचा सराव करा.

४.भाषणासाठी आत्मविश्वासपूर्वक उभे रहा. सुरुवातीलाच समोरील लोकांकडे बघा.म्हणजे तुमची भीती दूर होईल.

५.आपले शब्दोच्चार सुस्पष्ट असावेत.

६.भाषण करताना आवश्यकतेनुसार आवाजात चढउतार करा.

७.चेहऱ्यावरील हावभाव व हातवारे योग्य असावेत. तुमचे भाषण प्रभावी होण्यासाठी महत्त्वाचे अत्यंत महत्त्वाचे आहे.

८.सतत वाचन करा.भाषणासाठी तुमच्याकडे शब्दसंपत्ती असायला हवी.

९.भाषणाचे व्हिडीओ बनवा.आपल्या होणाऱ्या चुका पहा.पुढील वेळी चुका टाळा.

१०.अनावश्यक हालचाली करु नका.उदा.मध्येच माईक पकडणे,शर्टचे बटण पकडणे,खिशात हात घालणे इ.

११.प्रत्येक नवीन भाषणाच्या वेळी नव्याने चांगली तयारी करा.

१२.भाषण सादरीकरण करताना वेळेचे भान ठेवा.

१३. आपल्या भाषणात समरस व एकरुप व्हा.भाषण म्हणजे नुसते पाठांतर वाटता कामा नये.

१४. भाषण तयार करताना गरजेनुसार सुभाषिते, काव्यपंक्तीचा वापर करा.

१५. मान्यवर वक्त्यांची भाषणे वेळ काढूनआवर्जून ऐका.

१६. भाषणासाठी आपला आवाज महत्त्वाचा आहे. त्यासाठी आपल्या घशाची काळजी घ्या.

**(लेखक शिक्षक व प्रेरणादायी वक्ते आहेत)**

## दोघांच्या भांडणात...

एका जंगलामध्ये
दोन बोके होते
त्यांच्यामध्ये होते
मित्रत्वाचे अतुट नाते..

त्या दोघांनी एकदा
आणला लोण्याचा गोळा
समान हिस्स्यावरती
होता दोघांचाही डोळा..

समान वाटणीसाठी ते
कल्पना लागले मांडू
मत जुळेना दोघांचे तेंव्हा
जोरात लागले भांडू..

एका माकडाच्या कानी
तंटा त्यांचा गेला
दोघांनाही फसवण्याचा
विचार त्याने केला..

"भांडू नका मित्रांनो,
उत्तर पक्के झाले"
म्हणत ते माकड
तराजू घेऊन आले..

निर्णय हा ऐकून
खूश झाले बोके
दोघेही म्हणाले,
"ठिक आहे. ओके"..

माकड, लोणी टाकून
पारड्यात तोलू लागले
जिकडे होईल जादा
ते काढून खाऊ लागले..

करता करता असे
लोणी संपत आले
उरलेलेही खाऊन
माकड निघून गेले..

भांडणारे ते बोके
तसेच राहिले उपाशी



लाभ घेऊन भांडणाचा
माकड जेवले तुपाशी..

भांडणामध्ये दोघांच्या
त्यांचाच होतो तोटा
तिसऱ्याचाच या
भांडणात
फायदा होतो मोठा..!

-महादेव बी. बुरुटे, शेगाव,
ता.जत, जि. सांगली,
मो. 9765374805

## चंद्रावरची शाळा...!

आता काही दिवसांनी
चंद्रावर भरेल शाळा,
या शाळेमध्ये असेल
आकाशाचा खडू-फळा.

छोट्या-मोठया यानांतून
शाळेत जातील मुले,
बटनाला दाबताच
दार होईल खुले.

तेव्हा दप्तरांचे ओझे
मुलांजवळ नसेल,
ऑक्सीजनची टाकीच
ही पाठीवर असेल.

फक्त बटणे दाबणे
हेच असेल अभ्यास,
चंद्रावरच्या शाळेत
गेला की होतील पास.

– अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## स्वप्नातल्या चांदण्या...

अक्कलपुर चा एक कुमार
सर्वां पेक्षा जास्तच हुशार

आकाशाला त्याने लावली शिडी
चांदण्या तोडून मारली उडी

एक चांदणी तळ्यात पडली
दोऱ्या बांधून बाहेर ओढली

अंगणात लावले चांदण्याचे झुंबर
घरात प्रकटले परी चे अंबर

झोपित स्वप्नात अंधार झाला
खिशातल्या चांदण्या लुकलुक केल्या

-बलराज संघई,
मो. 9420015108







# निर्भीड, परखड, स्पष्टवक्ता पत्रकार : प्रकाश गोरे

आधुनिक केसरी

**प्रकाश यांचे बालपण, शालेय शिक्षण सटाणा जि. नाशिक येथे झाले १९७० पासून तो पुण्यात वास्तव्यास आहे. भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते कै. प्रमोद महाजन आणि प्रकाश पुण्यातील संघाच्या कार्यालयात एकाच खोलीत रहात असत व पुण्याच्या तरुण भारतमध्ये दोघांनीही एकत्रित नोकरी केली. आणीबाणीनंतर प्रकाश यांनी मुबंई लोकसत्ता येथे पत्रकार म्हणून काम केले. तेथून ते पुन्हा पुण्याला 'तरुण भारत' ला आले. अशी एकूण २२ वर्ष त्यांनी पत्रकार म्हणून नोकरी केली. पत्रकार म्हणून काम करताना अनेक मोठे नेते, मंत्री, पंतप्रधान यांच्या पुणें दौऱ्याचे वार्तांकन प्रकाश यांनी केले. उद्योग, व्यापार, विशेष बातमीपत्र अशी ५०० च्या आसपास त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. आणिबाणी प्रसंगा संदर्भात त्यांचे अनेक लेख गाजले. निर्भीड, परखड, स्पष्ट वक्ता अशी पत्रकार म्हणून प्रकाशला सर्वत्र ओळखले जाते.**

१९८० साली मुरादाबाद येथील घटनेत ३०० च्या आसपास लहान मुले चेंगरून मेली होती. पूर्ण कर्फ्यु होता, मिल्ट्रीचा बंदोबस्त होता अशा ठिकाणी प्रकाश यांनी तब्बल ८ दिवस तळ ठोकून वृत्तसंकलंन केलेले लेख लोकसत्तामधून प्रसिद्ध झाले.

अंतुले यांच्या काळातील महाराष्ट्रातील सिमेंट तुटवडा ,पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसर अशा विविध क्षेत्रातील अनेक प्रश्नांना प्रकाश यांनी वाचा फोडली. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचे कांदा आंदोलन, जिरायतदार/बागायतदार शेतकरी आंदोलने अशा अनेक घटनांचे लेख प्रकाश यांचे प्रसिध्द झाले. तसेच आणिबाणीत मनिलेंडींग संदर्भात सराफ व्यावसायिकांना झालेला त्रास, अशा अनेक विषयासंदर्भात त्यांचे लिखाण प्रसिद्ध झाले आहे. जैन समाजातील आनंद ऋषीजी, प्रीती सुधाजी, प्रवीण ऋषीजी यांच्याविषयी लेख व प्रीती सुधाजींच्या आई माताजी महाराज यांचे वरील पुस्तक प्रकाशित झाले.

प्रकाश हे धनकवडी पंचायतीत १० वर्ष पंचायत सदस्य म्हणून निवडून आले. भारतीय जनता पक्ष, पुणे कार्यकारणीचे ते ५ वर्ष सदस्य होते. ३ वर्ष टेलिफोन एडव्हायझरी सदस्य होते. २० वर्षा पासून बालाजीनगर व्यापारी असोसिएशनचे आजही अध्यक्ष आहेत. सहकार क्षेत्रात बँका तसेच गृहनिर्माण संस्थांवर ते सल्लागार आहेत. तसेच ते सहकार भारती, पुणेचे अध्यक्ष होते.

सहकार भारतीचे २ वर्ष पूर्णवेळ काम करीत असतांना अनेक राज्यात तसेच व्यवसायानिमित्त अनेकदा त्यांचे परदेशात जाणे झाले आहे. सहकार भारती ही संस्था अखिल भारतीय असून गेली 45 वर्षे सहकारातील 54 विभागासाठी सामाजिक कार्य करते . "संस्कारातून सहकाराकडे !" ' संस्कार चांगले असतील तर सहकार चळवळ चांगली उभी राहते' हा मूळ उद्देश ठेवून संघाचे जेष्ठ प्रचारक श्रध्देय लक्ष्मणराव इनामदार यांनी सुरु केली. त्यांची सर्वत्र वकील साहेब म्हणून ओळख होती. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सहकार भारती या कार्यासाठी प्रकाश गोरे यांनी पूर्णवेळ काम केले. मग प्रकाश यांनी





व्यवसायातून निवृत्ती घेतली व पूर्णवेळ ते या कार्यात सहभागी झाले. इनामदार यांचा जन्मशताब्दी सोहळा दिल्ली येथे होता. या सोहळ्यासाठी विशेष निमंत्रक म्हणूनही प्रकाश उपस्थित होते. लक्ष्मणराव हे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गुरू. त्यांच्या या कार्यात सेवा करण्याचे भाग्य प्रकाश यांना लाभले. दिल्लीच्या या सोहळ्याला मा नरेंद्र मोदी पूर्णवेळ उपस्थित होते. त्यांनी सहकार या विषयावर मार्गदर्शन केले. प्रकाश यांची समाजसेवा, कार्य, लोकसंग्रह संघटन कार्य खरोखरच वाखाणण्याजोगा आहे.

भगवान कुलकर्णी
सटाणा

जम्मु काश्मिर परिसरात गेली 25 वर्ष श्री आदिक कदम यांनी सुरु केलेल्या बॉर्डरलेस फौंडेशनच्या कामानिमित्त प्रकाशला दिल्ली , जम्मू काश्मिर येथे अनेकदा जावे लागते. अतिरेक्यांकडून मारले गेलेल्या कुटुंबातील अनाथ मुलींचे संगोपन तसेच सैन्यदलासाठी कार्य चालते सध्या तीनशेच्या जवळपास अनाथ मुलींच शिक्षण आणि संगोपन या संस्थेमार्फत चालते.सैन्यदलासाठी आता पर्यंत 36 अँब्युलन्स या संस्थेने दिल्या आहेत अनेक बँका तसेच उद्योजकांच्या सहकार्यामुळे हे कार्य सुरु आहे.जम्मु काश्मिर मधील जनतेच्या आरोग्य तपासणीसाठी खास योजना नुकतीच सुरु करण्यात आली. या कार्यास पांच वर्षासाठी SBI बँकेने दोन खास अँब्युलन्स आणि पांच डॉक्टरांच्या टीमचा खर्च उचलला आहे.

असे अनेक उपक्रमात प्रकाशचे सेवा म्हणून काम सुरु आहे.पुण्यात असताना आपला पूर्ण वेळ संघ कार्यासाठी प्रकाश काम करतो सिंहगड रोड वरील नांदेड सिटी या टाऊनशिप मध्ये त्याचे वास्तव्य आहे. अश्या ह्या माझ्या प्रिय मित्राविषयी दोन शब्द लिहितांना सुध्दा खूप अभिमान वाटतो. प्रिय प्रकाश ! वाढदिवसाच्या मनःपूर्वक खूप खूप हार्दिक शुभेच्छा !

# रंगून सृजनरंगी श्रावण फुलून गेला



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**श्रावण येतो मनामनात नाचत नि गात तेव्हा बालकवींची श्रावणावरची 'श्रावणमासी हर्ष मानसी' ही कविता आठवतेच.लहानपणापासून ही कविता मनामनात रुजलेली आहे. श्रावणाचे आणि कवितांचे असे नाजूक नाते आहे. मंगेश पाडगावकरांनाही श्रावणात घन निळा बरसला असेच वाटते. या श्रावणाने संवेदनशील मनाला नेहमीच साद घातली आहे. महिलांसाठी तर व्रतवैकल्याने नटलेला हा श्रावण आहे. त्याच्या आगमनाने सृष्टी नटून थटून आनंदोत्सव साजरा करीत असते. कवींना हा श्रावण भुलवतोच परंतु वृत्ते आणि मात्रांमध्ये बंदिस्त असलेल्या गझलला आणि गझलकारांनाही हा श्रावण शब्दरंगात रंगायला भाग पाडतो.**

सुरेश भटांनी गझलेला मराठीत रुजवले तेव्हापासून विविध विषयांनी सज्ज अशा गझलेला श्रावण वर्ज्य कसा असेल. अनेक गझलकारांनी गझलेत श्रावणाला शब्दबद्ध केले आहे. इचलकरंजी येथील प्रसाद माधव कुलकर्णी यांना श्रावणातील ऊन पावसाचा खेळ आकर्षित करत आहे. हा श्रावण त्यांच्या गझलेतील शेरात पाठशिवणीचा खेळ खेळत आहे. बालकवींनी म्हटल्याप्रमाणे क्षणात येते सरसर शिरवे क्षणात पिवळे ऊन पडे असे कुलकर्णी यांनाही वाटते. क्षणात सावली असते तर क्षणात ऊन पडते. तेव्हा सृष्टीची ही मौज आल्हाददायक वाटते. उनाने थकलेल्या व श्रमलेल्या जिवाला हा पाठशिवीचा खेळ दिलासा देऊन जातो आणि

पाठशिवीचा खेळ खेळती ऊन सावल्या
आल्हादाचा आकाश थवा,श्रावण हिरवा...

या दिवसांत आकाशात नभांचा थवा आल्हाददायक वाटतो. पावसाने सुस्नात झालेली धरणी हिरवीगार झालेली असते. गझलकाराला वाटते हा श्रावणच हिरवागरा झाला आहे. आकाशात निरनिराळ्या आकाराचे, सायंकाळी विविध रंगांचे आकाशाचे तुकडे आपल्याला दिसतात.


गोव्याचे गझलकार सागर शायर (प्रकाश रामचंद्र क्षीरसागर) म्हणतात. सृष्टीचे सृजनसोहळे मानवाला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. त्याचे श्रावणाचे हे नटणे मुरडणे आणि आनंदाने नाचत आनंद वाटणे हे सृष्टी, धरणी आणि पशुपक्ष्यांना आकर्षित करतात. शायराला वाटते हा सृष्टीचा नवसृजनाचा सोहळा म्हणजेच श्रावण.

रंगून सृजन रंगी श्रावण फुलून गेला
झाडावरील पक्षी त्याला भुलून गेला

या सृजनरंगाने रंगलेला श्रावण विविध फुलांनी बहरलेला असल्याने तो फुलून आल्यासारखा शायराला वाटतो. या सृष्टीच्या सोहळ्याला झाडावरील पक्षी भुलून गेला आहे. कोकिळ कूजन करीत आहे (खरे तर आपल्या प्रियेला साद घालतो) तरीही कवीला वाटते की त्या सृजनरंगाला हा पक्षी भुलला आहे. त्याच्यात रमला आहे आणि आनंदाने गात आहे.

कारंजा - वाशिम (महाराष्ट्र) येथील रामहरी पंडित (चंद्रांशू) यांना वाटते श्रावण म्हणजे निसर्गाला पडलेले विविध रंगी स्वप्नच आहे. आयुष्य म्हणजे दुःखाचे ऊन आणि सावली म्हणजे सुखाचा बहर. ही आयुष्याची ऊनसावली झेलणारा हा श्रावण

आयुष्याची ऊनसावली झेलत असता
हिरव्या स्वप्नी अंकुरतांना फुलतो श्रावण



आयुष्याची ऊन सावली प्रत्येकाच्या जीवनात येत असते. सृष्टीत पावसाळ्यात श्रावण सजत असतो. त्या सजण्याने सर्वत्र हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे सगळीकडे दिसतात. उन्हाळ्यात गवताचे आणि इतर प्रकारचे बीज वाऱ्याने मातीत पडलेले असते. काही बिजे कीटक आणि पशु-पक्ष्यांच्या विष्ठेतून जमिनीत गाडली जातात. श्रावणात त्या बिजांना खरे तर आषाढातच या प्रक्रियेला सुरुवात होते. मात्र श्रावणात अंकुर फुटून हे बीज बहरू लागते. सृष्टीला पडलेले हे हिरवे स्वप्न अंकुरत असते जणू असे गझलकाराला वाटते.

प्रा. बाळासाहेब लबडे यांचा श्रावण फारच रोमँटिक आहे. सखीच्या ओठांना तो स्पर्श करून आपला आनंद व्यक्त करतो. या श्रावणाच्या सरी कोमल आहेत. सरीवर सर आली गं असं कविवर्य बा. भ. बोरकर म्हणतात. तसे या पावसाचे असते. कधी चार थेंब, तर कधी घन ओथंबून आले सारखे ढग तुषार उडवीत येतात.

सरी बरसतो सरसर कोमल
तुझ्या गुलाबी ओठावर श्रावण

श्रावणाचे हे बरसणे कवीला कोमल वाटते कारण तो धो धो कोसळत नाही अगदी हळुवारपणे येतो. एखाद्या प्रियसीला समजवावे, तिचा रुसवा काढण्यासाठी मखलाशी करावी असा तो येतो. सखीच्या गुलाबी ओठांवर हा श्रावण कोमलपणे बरसतो. इथे तो बरसत नाही तर प्रियाराधन करतो. लाडीगोडी लावतो इतका तो मृदू आहे, असे बाळासाहेबांना वाटते.

आमचा तरुण शायर मित्र दिनेश राजपुत याचा श्रावण थोडा हळवा झाला आहे. सर्वत्र दिसणाऱ्या चिमण्या आता कमी झाल्या आहेत. त्यांची प्रतीक्षा दिनेशच्या श्रावणाला आहे. श्रावणात सतत तर कधी थांबत अशा पावसाच्या सरी येत जात असतात. त्यांच्या बरसण्याने सर्वत्र तळी साचलेली दिसतात. त्या तळींमध्ये चिवचिवाट करीत कित्येक चिमण्या फिरत आणि न्हात असतात. हे पूर्वीचे चित्र झाले, असे तो म्हणतो. आता सिमेंटच्या जंगलाने कुठे माती नाही तर कुठे तळी नाहीत. सगळीचे तलावही बुजवले गेले आहेत, याची खंत हा गझलकार नकळत मांडून जातो. तो म्हणतो,

कुठे दिसेना न्हाताना ती चिमणी मजला
तिच्या स्वराला श्रावण आता माझा मुकला

त्याला बिचाऱ्या चिण्या न्हाताना आणि चिव चिव करीत बागडताना दिसत नाहीत. यामुळे श्रावणदेखील निराश झाला आहे. तिच्या चिवचिवाटाला आता श्रावण मुकला आहे. त्याला चिमण्या न दिसल्याने पाखरांचे स्वप्न पाहणारा श्रावण आता कोमेजला आहे, असे त्याला वाटते. त्याची खंत तो गझलेच्या या शेरात मांडतो.

आणखी एक तरुण गझलकार निलेश कवडे हाही निसर्गात आणि श्रावणावर भाळला आहे. निसर्गाने हा श्रावण त्याच्या सखीच्या अंतरंगात विसावला आहे. मुलींना व तरुणींना वा गृहिणींना गोंदून घेण्याची आवड असते. पूर्वीच्या काळातील म्हणजे अगदी दहा वीस वर्षांपूर्वी गोंदून घेण्याची पद्धत होती. आता ती टॅटूने घेतली आहे म्हणजे ऋतू बदलला, निसर्गही बदलला परंतु निलेश नॉस्टॅल्जिक झाला आहे. गतस्मृतींनी त्याच्या मनात ठाण मांडले आहे. तो म्हणतो,

एक श्रावण तिच्या अंतरी गोंदला
होउनी चिंब मग लाजली पालखी

एक श्रावण तिच्या अंतरी गोंदला आहे, हातावर, पाठीवर, कपाळावर नव्हे तर अगदी हृदयात हा श्रावण त्याने सखीच्या अंतरी गोंदला आहे. या सुखाच्या श्रावणसरीत सखी चिंब झाली आहे. तिच्या सुखसोहळ्याने पालखीही लाजली आहे, असे गझलकाराला वाटते. श्रावणात सर्वत्र मंदिरात धार्मिक कार्यक्रम आणि उत्सव तसेच भजनाचे ळकार्यक्रम होत असतात. गावोगावी मंदिरात देवाची अथवा देवीची पालखी मिरवणूक काढली जाते. पावसाच्या सरीत भिजलेली पालखीही लाजून चिंब होते, असे गझलकाराला वाटते. नाजूक नजाकतीने त्याने श्रावण गझलेत आणला आहे. रोमँटिक आणि आध्यात्मिक ढंगात तो श्रावणाला भिडतो.

एकंदरीत गझलकारांनाही नाना रूपात श्रावण भेटतो आणि भावतोदेखील, असेच या वानगीदाखलच्या शेरांतून कळते. श्रावणाचे मनभावन रूप ते गझलेतून मांडतात. गझल साचेबंद असली तरी श्रावणात ती बरीच खुलते व रसिकांना भावते. ती आनंदाने नाचू लागते. नवरस बरसू लागते, रसिकांना भिजवते.

# तुका चालवितो कावडी । प्रवृत्ती निवृत्ती चोखडी ॥

**तुकारामनीती**
**भाग 21**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

संत तुकोबाराय म्हणजे नित्यकाळ चालते-बोलते उपदेशपीठ ! त्यांचे जीवन, अनुभूती आणि त्यांतून जन्मलेले त्यांचे अलौकिक अभंगवाङ्मय म्हणजे मानवी जगण्याच्या सर्वच प्रश्नावर जणू रामबाण औषधच ! तुकोबांचे अभंग कधीही, कुठेही आणि केंव्हाही वाचा, ते तुम्हाला एक वेगळा विचार देऊन नव्याने विचारप्रवृत्त करतील यात तिळमात्र शंका नाही ! त्यांच्या गाथ्याचे कोणतेही पान उघडा आणि ते वाचा, जणू आपले रोजचेच अनुभव ! अशी प्रासादिक प्रतिभा अत्यंत कमी लोकांना लाभते आणि दुर्दैव म्हणजे त्यांना आयुष्यही अत्यल्प असते. तुकाराम महाराजांचेही अगदी तसेच झाले. जेमतेम 42 वर्षांचे आयुर्मान लाभलेले तुकोबा भविष्यात शत्रुंसह मित्रांचेही पथदर्शी होतील (?) असे त्यांच्या समकालीनांच्या स्वप्नातही आले नसेल. नेमके तेच तुकोबांच्या कृपांकित प्रतिभेने जगाला दाखवून दिले ! संत तुकोबांची गाथा जसजशी मी वाचत जातोय, तसतशी एकएक रत्नखाण हाती लागतेय ! विविध विषय आणि त्यावरील उच्च कोटीचे तत्वचिंतनीय अभंग वाचून एकीकडे मन प्रसन्न होतांना दुसरीकडे या प्रत्येक अभंगासोबतच्या तुकोबांच्या प्रसव वेदनांची सुद्धा थोडीथोडी जाणीव होते आहे ! हल्ली इथे एखादी कविता लिहायची असेल तर कवी शब्दांच्या आणि अनुभवांच्या शोधात असतांना तिकडे क्षणार्धात तुकोबा आपली अनुभवसमृद्ध कविता लिहून मोकळे झाले आहेत ! ही कोणत्याही वाङ्मय क्षेत्रातील क्रांतीच म्हणावी लागेल ! खऱ्या अर्थाने तुकोबाराय हे सर्वसाक्षी आणि सर्वस्पर्शी महान क्रांतिकारकच ! असा एकही विषय नाही की; ज्यावर त्यांनी अभंग लिहिले नाहीत ! जगण्याचं हरएक क्षेत्र त्यांच्या अभंगातून अधोरेखित होतांना वाचक-चिंतकांना सहजतेने जाणवत राहते.

तुकाराम नीती या सदरांतर्गत मागील 444 व्या अभंगातील 'वैद्यगोळी' अभंगाचा विचार होत असतांना, तुकोबांच्या गाथ्यात पुढे गोंधळ 5 आणि कावडे 5 असे सुंदर दहा (445 ते 454) अभंग आले आहेत. वर्तमानात श्रावण महिना चालू असून कावड आणि कावडे ही इथली प्रथा याचा काळात प्रकर्षाने समोर येते. आम्ही गोदावरीच्या किनारी रहात असल्यामुळे दहाएक वर्षापूर्वी गोदावरी परिसरातील काही कावडधारी पुरुष गोदावरीचे जलामृत भगवान शंकराच्या अभिषेकासाठी पायीपायी घेऊन जातांना दिसायचे. हल्ली मात्र हे कावडे दुचाकीवर का होईना, गोदावरीचे जलामृत अभिषेकासाठी नेतांना दिसतात. त्याशिवाय याच महिन्यात काही कावड यात्रा सुद्धा निघत असतात. या कावड्यांना आणि गंगाजलाने अभिषेक करणाऱ्या लोकांना आणि तुम्हा-आम्हाला सुद्धा या पाच अभंगांतून तुकोबा उपदेशीत करतांना दिसतात. कावडे अभंगांची सुरुवात "आहा आहा रे भाई..." अशी होतांना त्या अभंगांना चालण्याची आणि सहजतेने गीताची लय प्राप्त झाली आहे. या कावड्यांना उपदेशीत करतांना संत तुकोबाराय अत्यंत मोलाचा संदेश देण्यासाठी लिहितात,

**जिंकाल तरी जिंकाल रे अभिमान । दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान ।**
**धराल ते धरा शंभूचे चरण । दावाल पण ऐसा दावा तो ॥**
**पराविया नारी माउली समान । परधन बाटों नेदी मन ।**
**जीवीत्व तें तृणासमान । स्वामिकाजी आणि शूर म्हणो तया रे ॥**
**तुका चालवितो कावडी । प्रवृत्ती निवृत्ती चोखडी ।**
**पुढती अधिक गोडी । भरुनी कळस भजन आवडी ॥**
**(450)**

ही विचारांची कावड तुकोबा चालवत आहेत. कावड चालवतांना फक्त भगवान शंकराला गंगाजलाने स्नान घालणे महत्वाचे नसून त्याबरोबरच माणसांनी अभिमान जिंकून लोकलाज आणि मानपान जीवनातून हद्दपार करायला हवा. भगवान शंकराची पूजा करतांना बाह्य अवडंबर थांबवून परस्त्री आणि परधन या शत्रूपासून माणसाने आपले मन मलीन होऊ न देता शुद्ध-सात्विक विचारांची कास धरावी. आपले जीवन क्षणभंगुर असून तृणासमान म्हणजेच गवतापेक्षाही क्षुद्र असणारे मानवी जगणे आहे असे मानून प्रवृत्ती-निवृत्ती यापासून सर्वथा अलिप्त राहिल्यास माणूस सर्वकाळ आनंदी राहू शकतो. असे झाल्यासच खऱ्या अर्थाने माणूस कोणत्याही भक्तीच्या योग्यतेचा होऊ शकतो असे तुकोबाराय दावा करतात. याशिवाय, आणखी कावडीचे अभंग लिहितांना पुढे

**सदा करितो चि निंदा । स्वप्नीही गोविंदा आठवीना ॥**
**खासेमध्यें धन पोटासि बंधन । नेणें ऐसा दानधर्म काही ॥**
**तुका म्हणे नटे दावुनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ॥ (453)**

कावड्यांना म्हणजे आपणा सर्वानाच तुकोबांचा हा उपदेश मोठा बोलका आहे. परनिंदा टाळून आपल्या हृदयात सद्विचार म्हणजेच ईश्वराचं अस्तित्व कायम ठेवावे. काही माणसं एवढी कृपण असतात की, त्यांच्याकडे संपत्ती असुनसुद्धा स्वतः उपवाशी राहतात, जीवाला खात नाहीत आणि इतरांनाही दान-धर्म करत नाहीत. इथे तुकोबांना अपेक्षित म्हणजे धनवंतांनी गरजवंतांना मदत करावी, जेणेकरून श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी कमी होईल. याशिवाय शेवटी भक्तीचे अवडंबर माजवणाऱ्यांना तुकारामबोवा फक्त भक्तीचे सोंग दावणारे सोंगाडे म्हणून संबोधतात ! वर्तमान काळात अशा सोंगाड्यांचीच संख्या जास्त वाढल्यामुळे खरे आणि सोंगाडे ( ? ) यात फरक करणे मोठे कठीण होऊन बसले आहे. असे अनेक अभंग तुकाराम महाराजांनी लिहिले आहेत, जिथे खरा भक्त आणि सोंगाड्या यात स्पष्ट फरक उजागर केला आहे.

कावडीच्या अभंगातील शेवटचा अभंग अत्यंत मोलाचा असून त्यात तूकोबांनी खरे-खोटे याचा जणू आरसाच जगांसमोर ठेवला आहे. या अभंगाची काही चरण आपण लक्षपूर्वक वाचली तर लगेच लक्षात येवून जाईल.

**आहा रे भाई । गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ ।**
**तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठ तनु देवाचिया ॥**
**समुद्र नदी नव्हे पैं गा । पाषाण म्हणों नये लिंगा ।**
**संत नव्हती जगा । मानसा त्या सारिखे ॥**
**सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु ।**
**नाहीं नाहीं चर्मांतु । कृष्णजिन व्याघ्रांबर ॥**
**मुक्ताफळें नव्हेति गारा । खड्याऐसा नव्हे हिरा ।**
**जीव नव्हे सोइरा । बोळवीजे स्वइच्छेनें ॥ (454)**

हा संपूर्ण अभंग आपण सार्वांनीच वाचून घ्यावा जेणेकरून संतांची लक्षणे सांगत असतांना तुकोबाराय इतर उपमा आणि उपमेयांचा विचार मांडतांना दिसतात. कोणतेही पाणी गंगाजल किंवा कोणताही वृक्ष हा वड-पिंपळ होईल का ? कोणतीही माला तुळसी किंवा रुद्राक्ष माळ होईल का ? असे एकापेक्षा एक सरस प्रश्न इथे तूकोबांनी उपस्थित केले आहेत. कोणत्याही धातूला सोने किंवा मिठासारखी वाळू दिसली म्हणून त्या वाळूला मीठ म्हणता येईल का ? अशाप्रकारे संत हा केवळ बाह्य लक्षणांनी ओळखता



येईल का ? हे प्रश्न सर्वकालीन सर्वांना विचार प्रवण करणारे असून या माध्यमातून तुकोबांनी इथल्या थोतांड आणि सोंगे आणणाऱ्या बहुरूपी लोकांना सजग केले आहे. हा संपूर्ण अभंग एकदा आपण सर्वांनी वाचलाच पाहिजे. कावड प्रकरणातील हे सर्वच अभंग वाचले कि; बऱ्याच गोष्टी उजागर होतांना दिसतात. तुकोबांचे कावडीचे हे अभंग अत्यंत महत्वपूर्ण असून त्यांच्या इतर अभंगाप्रमाणेच उपदेश करणारे असले तरी हे अभंग पाठांतराला थोडे कठीण आहेत. यातील जवळपास सगळेच अभंग हे आठ ते दहा चरणांचे असून प्रत्येक चरण हे चार ओळींचे आहे. या सर्वच अभंगावर सखोल चिंतन होणे अपेक्षित असून या अभंग आधारे वर्मानातील स्वतःला संत, महाराज, आचार्य, शास्त्री किंवा अन्य विशेषणे लावून मिरवणाऱ्या लोकांनी स्वतःच्या जीवन आणि कृतींचे काळजीपूर्वक सिंहावलोकन करणे अत्यंत गरजेचे वाटते. संतांचे जीवन, प्रबोधन आणि अभंग लेखन यावर वर्तमानातील महाराज मंडळींनी सखोल चिंतन करणे आज काळाची गरज बनली आहे. आज सर्वच कीर्तनकार-समाजप्रबोधनकार-व्याख्याते-कवी-लेखक यांनी तुकोबांचे हे अभंग जरूर वाचून त्यावर सखोल चिंतन मांडण्याची वेळ आली आहे. एखादा विचारवंत-लेखक कालातीत विचारांचे प्रकटीकरण करतांना त्याचा परीघ हा किती विस्तारलेला आहे ( ? ) याचे नक्कीच अवलोकन होणे अपेक्षित आहे. आजघडीला आपण सर्वजण मिडीयावर सक्रीय असतांना लोक लेखक-विचारवंत यांच्याकडून मोठ्या अपेक्षा बाळगून आहेत. आपल्या लेखनातून जर आपण वास्तवाचे चित्रण मांडले नाही तर काळाच्या ओघात आपले विचार रद्दीत जमा झाल्याशिवाय राहणार नाहीत. त्यासाठी या खडतर काळात मोठ्या जबाबदारीने वर्तन आणि दर्शन यावर सखोल चिंतन होऊन माणूस कसा सर्वार्थाने सुरक्षित होईल ( ? ) या विषयी लिहिणे अपेक्षित आहे. आपल्या भोवताल संपूर्ण झगमगाट असून 'तात्काळ रिझल्ट' असा ट्रेंड विकसित होतो आहे, परंतु 'झपाट्याने वाढणारे झाड फारकाळ टिकत नाही' हा गुणधर्म वैश्विक आहे हे विसरून चालणार नाही!

जगद्गुरू तुकोबांचे अभंग हे सर्वकालीन जागृती करत असतांना आपण त्याकडे डोळेझाक करून जमणार नाही. आज शिकलेल्या लोकांनी जात-धर्म-पंथ-प्रदेश याबाहेर येऊन विश्वबंधुत्वाची कास धरणारे सर्वसमावेशक लेखन करणे अपेक्षित आहे. संत तुकाराम असोत की अन्य कोणताही विचारवंत असो, त्यांच्या विचारांच्या कक्षा आणि परीणामकारकता तपासणे अत्यंत गरजेचे असते. इथे 'तुकाराम नीती' अंतर्गत लेखन किंवा चिंतन मांडत असतांना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात त्या म्हणजे वर्तमानात आपण सर्वानीच मोठ्या जबाबदारीने लेखणी उचलून समाजाच्या उच्च शिक्षित लोकांना वाचनासाठी प्रवृत्त केले पाहिजे. वाचन आणि चिंतन झाले की माणूस आनंदी होईल आणि माणूस आनंदी झाला की; तो व्याधीमुक्त होईल. तेंव्हा, कोणत्याही गोष्टींचा अनावश्यक संग्रह मग ते विचार असो, धन असो कि माणसं असो हे नेहमीच घातक राहिले आहे. तेंव्हा सर्वच गोष्टींचा मर्यादित संग्रह करून त्या आपल्या जीवन जगण्यासाठी कशा सुखदायी ठरून त्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याचा प्रकर्षाने विचार हेने अपेक्षित आहे ! असे झाले तर 'वसुधैव कुटुंबकम' ही विश्वकुटुंब संकल्पना प्रत्यक्षात उतरायला वेळ लागणार नाही. कुठेही युक्रेन-रशिया युद्धासारखा भयंकर नरसंहार होणार नाही ! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने माणूस विकसित झाला असे म्हणता येईल ! अन्यथा एसी गाडी किंवा एसी घरांत बसून घाम, अस्वस्थता, व्याधी माणसांना सोडणार नाहीत ! हे त्रिकालाबाधित सत्य आहे ! तेंव्हा, चला तर मग, भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव निमित्ताने हा विचार अंगीकारण्याचा संकल्प करून भारतीय स्वातंत्र्याचा शतक महोत्सव याहीपेक्षा मोठ्या जल्लोषात साजरा करूयात ! जय तुकोबाराय !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# चकवा आणि तलाश - शोध आत्म्याचा (?)

आधुनिक केसरी


चकवा मराठी, तलाश हिंदी.
PROTAGONIST: अतुल कुलकर्णी आणि अमीरखान,
VICTIM : मुक्ता बर्वे, संदेश कुलकर्णी, दीपा परब आणि राणी मुखर्जी, अमीरखान !

शोधायचं असतं एक, सापडतं काहीतरी दुसरंच... गुंतागुंत, खुनाचं रहस्य, आत्म्याचं अस्तित्व, सायकॉलॉजिकल इफेक्ट, माणसाची असहाय्यता !!

IT IS IMPERATIVE FOR FILM MAKER TO KNOW THE DIFFERENCE BETWEEN MYSTERY AND SUSPENSE...!!!

चकवामध्ये अगदी आवश्यक तितकेच प्रसंग आहेत. रहस्य शेवटी उलगडते, गूढदेखील. तलाश थोडा आणखी जास्त पात्रे व पात्रांचे प्रसंग पसरट करून दाखवतो. प्रेक्षकांसाठी रहस्य नाही, पण गूढ मात्र आहे. बळी पडलेली व्यक्ती (VICTIM) दिसते फक्त प्रोटगानिस्टलाच, दोन्ही कलाकृतींमध्ये शोध घेणारी व्यक्ती CONFUSED होते. काय खरं आणि काय खोटं, हेच कळेनासं झालेलं...

मराठी आणि हिंदी सिनेमाच्या बजेटमध्ये फरक असला तरी कथा, आशय, परिणाम यांत चकवा कुठेही कमी पडत नाही, सूचक प्रसंगांमुळे त्याची कलात्मकता वाढते. कोकणातल्या खेड्यातलं साधं कुटुंब, तिथला कारखाना व त्याचा फायदा घेणारी लोभी व बेरकी माणसं यांच्यातला संघर्ष हळूहळू गडद करत सिनेमा आपल्याला चकवा देत पुढे जात राहतो. दोन्हींतही शेवटी रहस्यस्फोट होतो, पण गूढ मात्र कायम राहतं समुद्राच्या अथांग तळासारखं ! तलाशची व्याप्ती पोलिस ऑफिसर, वेश्याव्यवसाय, गुन्हेगारी जग, मुंबईचं जीवन यामुळे मोठी आहे. वैयक्तिक दुःख व अपराधभावना यांबद्दलचे ढोबळ समज कसे माणसाची दिशाभूल करतात, मनःशांतीसाठी चाललेली धडपड कशी व्यर्थ वाटते, गुन्ह्याचा शोध चालू असताना अकल्पित वास्तव बाहेर येतं, सीसीटीव्हीच्या शूटिंगमध्ये जी व्यक्ती आहे अशी खात्री असते पण फिल्ममध्ये तिचा चेहराच नसतो, तेव्हा कुठे जाणवतं... हे गूढ काय, कसलं असेल ते... !!




गुन्ह्यासाठी पुरावा म्हणून गृहीत धरलेलं ते सत्य असलं तरी ग्राह्य नसतं, कारण दृश्यमान नसतं. तलाश आहे घटनांचा, त्यांच्या संगतीचा आणि

**चित्रपट परीक्षण**



नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

त्याबरोबरच स्वतःच्या अंतर्मनाचा, मानवी दुःखाच्या अदृश्य परिणामांचा, अबोध व कारुण्यमय जिण्याचा, भावनांच्या तरलतेचा, प्रेमातल्या वैफल्याचा, नात्यांच्या खोलीचा... केवळ शोध आणि न संपणारा अटळ, अपरिहार्य शोध !!!



# आ. अंबादास दानवे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संभाजीनगरचे जिल्हाप्रमुख तथा आ. अंबादास दानवे यांची विधान परिषद विरोधीपक्ष नेते म्हणून निवड झाल्यानंतर पूर्व विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती संभाजीनगर महानगरपालिका रेणुकादास (राजु) वैद्य यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी, ढोली बाजाच्या गजरात जोरदार उत्साहात घोषणाबाजी करून स्वागत करण्यात आले. दानवे यांची वही तुला करून सत्कार करण्यात आला. या वह्या गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. ७५व्या अमृत महोत्सव निमित्ताने यावेळी उपस्थित नागरिकांना राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख राजू राठोड तालुका प्रमुख बाळासाहेब गायकवाड, पूर्व शहरसंघटक राजू वैद्य, शहरप्रमुख विजय वाघचौरे, अल्पसंख्याक आघाडी शहरप्रमुख अखिल शेख, उपशहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, मा.नगरसेवक गजानन मनगटे, कांतीलाल निरपगारे, रतन साबळे, डॉ. कांतीलाल व्यास, कालिदास बारबिंड, वसंत अडगावकर, पंकज पाटील, निलेश कुंटे, विभागप्रमुख बापू कवळे, संतोष गायकवाड, राजू चव्हाण, उपविभागप्रमुख अडलक, शाखाप्रमुख राम केकान, कैलास तिवळकर, प्रशांत दिघुले, स्वप्नील साबळे, दीपक संभेराव, भरत ढवळे, उद्धव चौधरी, संजय तांबे, बंटी कचकुरे, अनिकेत साईवले, राज नीळ, रघुनाथ वीर, अप्पा थोरे, पुष्पक स्वामी, विनय मुटेकर, शुभम पदमवार, योगेश भालेराव, विनोद मोरे, धनराज मांडावे, शरद कुलकर्णी, गणेश राऊत, मनोज गायकवाड, मनोज खोतकर, स्वप्नील धनेधर, शुभम जगताप, पियुष कोयलकर, अशोक साबळे, चंद्रकांत मगरे, उमेश साबळे, आनंद शेळके, भीमराज दुशिंग, पराग कोयलकर, मिलिंद बापट, सूर्यकांत खंडेलवाल, डॉ उदय वारे, माधव राहतेकर, सागर जोशी, अजिंक्य दंडवते, संजय मंत्री, शुभम पदमवर, गणेश कुलकर्णी, विनोद तंगे, मुकुंद राहतेकर, मुन्ना लाहोटी, वल्लभ पटेल, हिम्मत पटेल, शिवजी भाई पटेल, पियुष पटेल, सुरेश खडके, मयूर काथार, किरण भंडारी, निलेश सतोनकार, अनिल कोळी, निखिल कुलकर्णी, निलेश कुलकर्णी, हेरंब कुलकर्णी, अभिषेक मंत्री, कमलेश गांधी, मग्गीरवार, मनोज संकलेचा, निकेत जेधे, नारायण भाई सारडा, जितेंद्र राजपूत, जयेश दक्षीने, प्रवीण जगताप, विकास पारस्कर, योगेश मुनेमणिक, बाळासाहेब वाळुंज, दुर्गादास देशपांडे, सार्थक देवरे, राधेश्याम तिवारी, जिजीभाऊ खैरनार, संजय तांबे, निलेश लहाने, प्रशांत कँदल, चैतन्य सराफ, पदाधिकारी, शिवसैनिक व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते

# संतांची समरसता



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**आपला भारत देश सर्वधर्मसमभाव जपणारा, आपली संस्कृती, अभिमान जपणारा आणि आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा सर्वच पातळ्यांवर सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा आहे, याचा सर्व भारतीयांना सार्थ अभिमान आहेच. आणि आपला देश आणि महाराष्ट्राला लाभलेली संतपरंपरा यामुळे आपल्या देशाची एक वेगळी प्रतिमा निर्माण झाली. फक्त मी, माझे कुटुंब या चौकटीतून बाहेर पडून संपूर्ण समाज आपलं कुटुंब आहे आणि आपण समाजासाठी काही केले पाहिजे, ही समभावाची भावना जपणाऱ्या अनेक संतांनी आपल्या विचार, आचार, आपल्या लेखणीतून तळागाळातील लोकांना एकत्र आणलं, समाजातील भेदभाव समूळ नष्ट करून एकत्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी अनेक संतांनी आपलं जीवन समाजासाठी अर्पण केलं, अशा संतांचा परिचय, त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यन्त पोहोचणं गरजेचे आहे.**

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची भूमी आहे. कर्मकांडाविरुद्ध बंड, जनसामान्यांविषयी कळवळा, भाषेचा ज्वलंत अभिमान, 'दुरितांचे तिमिर' नष्ट करून तेथे ज्ञानाची पव्हे उघडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न संतसाहित्यातून झालेला दिसून येतो.

वाईट चालीरीती, जुन्या प्रथा, अत्याचार याला विरोध करून लोकांच्या मनात जागृती निर्माण करण्याचे कार्य थोर संतांनी केले. अभंग, भारुड, भजन, कीर्तन या माध्यमातून संतांनी लोकजीवनातील विसंगती तसेच सामाजिक समरसता, बांधिलकी जपण्याचे कार्य केले. ईश्वरभक्तीची ओढ निर्माण केली.


साहित्यातील हा अमूल्य ठेवा नव्या पिढीपर्यन्त योग्य रूपाने पोहोचावा, यासाठी लेखक रवींद्र गोळे यांनी 'संतांची समरसता' या पुस्तकाचे लेखन केले. आताच्या पिढीला कार्टून, सुपरहिरो यांची ओळख आहे पण आपल्या संस्कृतीतील खरे सुपरहिरो ज्यांनी समाजाला 'तिमिरातुनी तेजाकडे' जाण्याचा मार्ग दाखवला अशा संतांची ओळख व्हायला हवी, या हेतू मनात बाळगून लेखकाने निवडक संत, त्यांचा जीवनप्रवास, त्यांचे कार्य यांची थोडक्यात ओळख करून दिली आहे. छोट्या संक्षिप्त लेखाद्वारे साध्या-सोप्या शब्दरचनेतून त्या त्या संतांचा परिचय अगदी सहजतेने करून दिला आहे.

नेमकेपणा, लेखाची सुसूत्रता, सोपी भाषाशैली आणि योग्य माहिती, कमी पृष्ठसंख्या यामुळे हे पुस्तक एक बैठकीत वाचून होण्याजोगे आहे. नेमक्या शब्दात संतांचे जीवनचरित्र मांडणं सोपे नाही पण लेखकाने मुलांच्या वैचारिक, बौद्धिक आकलनशक्तीचा विचार करून कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त संतांचा परिचय लेखातून होईल, या हेतूने लेखन केले आहे.

संत एकनाथ, पेजावर स्वामी, संत कबीर, नरसी मेहता, नानकदेव, आचार्य रामानुजाचार्य, संत मीराबाई, चैतन्य महाप्रभु, शंकरदेव, समर्थ रामदास या संतांचा परिचय या पुस्तकात दिलेला आहे. जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा धर्म श्रेष्ठ आहे, ही भावना जनमानसात रुजवण्याचं कार्य संतांनी केले. एकनाथांचे भारुड, कबिरांचे डोहे, समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक, तुकारामांचे अभंग, व्यक्त होण्याची माध्यमे वेगळी असली तरी त्यातून समाजाचे रूप, त्याचे प्रतिबिंब आढळून येते.

अद्वैतभाव फक्त महाराष्ट्रात पाहायचा नसतो तर संपूर्ण जगात पाहायचा असतो, ही दृष्टी देणारे 'संतांची समरसता' हे पुस्तक आहे. हा लेखसंग्रह वाचताना एक गोष्ट जाणवते, की माणुसकी हाच खरा धर्म आहे. अध्यात्म म्हणजे फक्त देवाचे नामस्मरण करणे नव्हे, सामाजिक कार्ये करणे, एकमेकांना सहकार्य करणे, स्नेहभाव जपणे होय. मुलांच्या कोवळ्या मनाच्या मातीत हे एकत्वाचे बीज पेरायला हवे. म्हणतात ना, 'पेराल ते उगवेल'... आपण प्रेमभाव, एकत्व ही भावना मनात रुजवली तर आपुलकीची फुले उमलणारच. संत तुकाराम महाराजांनी म्हटलेले आहेच, 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'
'तुका म्हणे तोचि संत, सोशी जनाचे आघात'... टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही, ही म्हण आपल्याला माहीत आहेच. या पुस्तकाद्वारे संतांचा जीवनप्रवास उलगडतो, त्यासोबतच त्यांच्या कार्यकाळात त्यांना किती घाव सोसावे लागले, याची जाणीवही होते.

रूढ संकेतांच्या, दांभिकपणाच्या आणि अंधश्रध्देच्या विध्वंसाने समाजाची मनोभूमी नांगरून तिच्यात प्रांजळ भक्तिभाव, नीती आणि समाजोद्धाराचे विधायक बी पेरणाऱ्या या संतांचे कार्य मुलांपर्यंत पोहोचावे, यासाठी मुलांना हे पुस्तक नक्की वाचायला द्या ! खरेच अशा संस्कारक्षम पुस्तकांची ठेवणी घरोघरी असायलाच हवी !




# शेती नासवतोय का ? पिकवतोय.....!

आधुनिक केसरी

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** 1985 साली निवडुंगाच्या झाडावर आढळलेल्या लोकरी माव्याने त्याला आवडतं व उपयुक्त असे खाद्य शोधत जीवन प्रवास चालूच ठेवला, त्यानंतर याच लोकरी माव्याने सर्वप्रथम २००४ पुणे जिल्ह्यामध्ये ऊस हेच आपले उपजीविकेचे साधन बनवले यामुळेच संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या लोकरी माव्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच कंबरडे मोडले. शेतकऱ्यांनी अधिकच्या उत्पादनाच्या हव्यासापोटी भरमसाठ रासायनिक खताचा वापर, पाट पद्धतीने, अवेळी अयोग्य पाणी वापर यामुळे लोकरी मावा फैलाव वाढतच गेला. तर इकडे शेतकऱ्यांच्या आर्थिक वृद्धीसाठी नावाजलेलं पांढरे सोने (कापूस) गुलाबी बोंड आळी ने कधी डागील झाले कळलेच नाही.

कारण वारंवार तीच पिके, कृषी दुकानदारांच्या त्यांच्या सोयीयुक्त व चुकीच्या फवारणी बाबत मार्गदर्शन, माती परीक्षणाबाबत कृषी विभागाकडून कुठलीही जनजागृती नाही. त्यामुळे जमिनीस हवा तो घटक न मिळणे इतर खताचा चुकीच्या पद्धतीने व अतिवापर यामुळे शेतकऱ्यांसमोर कर्जाचा उभा डोंगर तयार झाला. त्यानंतर वाढते पोल्ट्री व्यवसाय, दुग्ध व्यवसाय त्यासाठी लागणारे खाद्य हे प्रमुख मका असल्याने आपोआपच मका पीकावर शेतकऱ्याची मदार आली. मका पिकामध्ये शेतकऱ्यांनी युरियाचा अतिरेक केला, इथेही शेतकऱ्याच्या मका पिकामध्ये लष्करी आळीने थैमान घातले. शेतकऱ्यांना योग्य वेळी मार्गदर्शनासाठी कृषि विभागाचा आभाव राहिल्याने, मका पिकामध्ये कामगंध सापळे लावण्या ऐवजी शेतकऱ्यांनी मका पीक पदरात येईपर्यंत पोपळवलेल्या कृषी व्यवसायिकांच्या अवास्तव खर्चाच्या फवारण्याला जोर दिला. यातच आज मका पिकावरील लष्करी अळी कीटकनाशकाला तात्पुरत्या स्वरूपात दाद देत तिचे कार्य पुढे चालू ठेवत शेतकऱ्यांना मात्र मका पिकांमधून कार्यमुक्त करून टाकले ही पण देशाच्या मूल्य साखळीमध्ये खूप मोठी चिंतेची बाब आहे. असाच दरमजल करत शेतकरी गेल्या चार-पाच वर्षांपासून कमी कालावधीचे कमी खर्चाचे व रोखीचे खात्रीशीर उत्पन्न देणारे म्हणून सोयाबीन पिकाला पसंती देत बहुतांश शेतकरी वर्ग सोयाबीन पिकाकडे वळला आहे.






मराठवाड्यामध्ये सोयाबीनचे वाढते पेरणी क्षेत्रामुळे मजूर टंचाई, यांत्रिकीकरणावर भर त्यामुळे बैलांचे प्रमाण कमी होणे, सोयाबीनला योग्य वेळी कोळपणी न होणे अशा समस्या भासू लागल्याने बाजारात आलेले दूध वर्गीय तणनाशक चा वापर शेतकऱ्यांकडून एवढ्या प्रमाणात वाढत गेला की, शेती व बांध यावरील तणनाशक फवारणीमुळे चक्क गोगलगायने तिच्या उपजीवकासाठी अन्न म्हणून सोयाबीनलाच पसंती दिली. गोगलगाय, पैसा यांनी यावर्षी मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाचे नुकसान केले आहे. खरं तर याआधीही गेले कित्येक दिवसापासून गोगलगाय हे शेतीसाठी नवीन नाही. पावसाळा सुरू झाला की बांधावरील गवतावर, शेतात गोगल गाय, पैसा फिरलेले दिसून येते. या अगोदर कधी कुठे ऐकले का? की गोगलगाय पैशाने पिकाची नासाडी केली. ह्या किडीचा दिनक्रम चुकीचा नाही तर आपल्या शेती पिकवण्याच्या पद्धतीत बदल स्विकाऱ्याला आपण तयारच नाहीत. पारंपारिक पद्धतीने शेती, शेतीमध्ये पीक पालट न करणे, वारंवार एकदल वर्गीय पिके घेणे, खर्चाच्या बोजामुळे उन्हाळी मशागत न करणे, जमिनीत शेणखत भरून उन्हाळ्यात तिला आराम न देणे, कृषी यंत्रणा नावालाच मार्गदर्शनाचा अभाव यामुळे पुढील काळात संपूर्ण फड गोगलगायने किंवा इतर अजून नवनवीन किडीने नष्ट केले तर नवल नसावे. कारण यावर्षी लवकरचसोयाबीन पिकावर येलो मोजक रोगाचाही प्रादुर्भाव वाढत चालला आहे.

इथे तरी कृषी विभागाला योग्य वेळी जाग येणे गरजेचे असताना तसे न झाल्याने पुन्हा शेतकऱ्यांनी शेतात गोगलगायी साठी कृषी दुकानदारांच्या भोंदूगिरीमुळे अवास्तव फवारणी सुरू केली. मुळात गोगलगाय हे कीटकनाशक फवारणीने आटोक्यात येत नाही. याबाबत योग्य त्याच उपाय करायला हव्यात हे बळीराजाला सोयाबीन पिकाची अवस्था कापूस पिकाप्रमाणे झाल्यावर कळणार का? शेतकऱ्यांनी कापूस,मका, तूर या पिकाला बगल देत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सोयाबीन पेरा हा... एवढ्या प्रमाणावर आहे. तरीही सुप्त अवस्थेत राहिलेल्या कृषी विभागाची कामगिरी.. गेली दोन-तीन वर्षापासून गोगलगायीचा सोयाबीन पिकाकडे मोर्चा.... तरीही कुठलेही ठोस प्रभावशाली त्याच्यावर पर्यायी औषध नाही.

गोगलगाय बाबतीत जी नियंत्रणाची रेषा आहे. ही नियंत्रण रेषा गोगलगायचा प्रादुर्भाव झाल्यानंतरच आहे. गोगलगाय येऊच नये म्हणून कृषी विभागाच्या संशोधनात अजूनही कुठले पर्यायी औषध नाहीये. तर कृषी सहाय्यकाची भूमिका ही घरात बसून नसून तर शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मार्गदर्शनाची आहे. कृषी सहाय्यक यांच्याकडून शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन न मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन व इतर पिकांचे फड चे फड नष्ट झाल्यावर च कृषी विभागाकडून शासनाच्या पैशाचा चुराडा करत बाधित क्षेत्राकडे कृषी संशोधक, कृषी विद्यापीठ अधिकारी यांचे दौरे निघतात. शेतकऱ्यांच्या व शेतीच्या हितासाठी कृषी विभागाने वेळीच बारकाईने लक्ष घालण्याची गरज आहे... नाहीतर "भारत हा कृषी प्रधान देश" आहे. हे वाक्य इतिहास जमा व्हायला वेळ लागणार नाही..




आधुनिक केसरी

# चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत

**अ) गणिताची मुलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार**



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

९) मूळसंख्या : एकपेक्षा मोठ्या असणाऱ्या ज्या संख्यांना "१" ने आणि त्याच संख्येने भाग जातो. तसेच कोणत्याच संख्येने निःशेष भाग जात नाही, अशा संख्यांना मूळसंख्या म्हणतात.
उदा. १, ३, ५, ७, ११, १३, १७, १९... इत्यादी.

**१०) जोडमूळसंख्या :** "२" चा फरक असणाऱ्या मूळसंख्यांच्या जोडीला जोडमूळसंख्या किंवा जुळ्यामूळसंख्या म्हणतात.
उदा. (३-५), (५-७), (११-१३), (१७-१९)... इत्यादी

**११) सहमूळसंख्या :** ज्या दोन किंवा अधिक संख्यांना "१" व्यतिरिक्त सामाईक अवयव नसतो. (म्हणजेच "१" हाच सामाईक अवयव असतो.) अशा संख्यांना सहमूळसंख्या किंवा सोपक्ष मूळसंख्या म्हणतात.
उदा. (७-१०), (१४-१९), (१३-१५-२९)... इत्यादी

**लक्षात ठेवा :** १) "१" ही संख्या मूळसंख्या नाही.



८) सांगा पाहू...
हताला बोटे पाच
एक आणि चार पाच
दोन आणि तीन पाच
सुनेला सासूचा जाच

२) "२" ही एकमेव समसंख्या मूळसंख्या आहे.
३) २ ते १०० पर्यंत एकूण २४ मूळसंख्या आहेत.
(२, ३, ५, ७, ११, १३, १७, १९, २३, २९, ३१, ३७, ४१, ४३, ५३, ५९, ६१, ६७, ७१, ७३, ७९, ८३, ८९, ९७ इत्यादी

**ब) गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच :**

१) मूळसंख्यांना कोणत्या संख्यांनी भाग जातो?
२) जोडमूळसंख्यांच्या जोडीत कितीचा फरक असतो?
३) सहमूळसंख्यामध्ये कोणता अवयव सामाईक असतो?
४) कोणती समसंख्या मूळसंख्या आहे?
५) कोणती विषमसंख्या मूळसंख्या नाही?

**क) उखाणा :**

१) नमस्कार शब्दाचा समानअर्थी शब्द आहे प्रतिपात, एकपेक्षा मोठ्या असणाऱ्या ज्या संख्यांना एकने आणि त्याच संख्येने भाग जातो, त्या मूळसंख्या असतात.
२) भांडण शब्दाचा समानअर्थी शब्द आहे कब्जा, "२" ही एकमेव समसंख्या आहे मूळसंख्या.

**ड) कविता. क्रमांक ८ वा.**

**(क्रमशः)**

# धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती : अहिल्याबाई होळकर



प्रा.डॉ. गणेश गोविंदराव माने
संपर्क क्र. 9604022774

आधुनिक केसरी

मराठ्याच्या इतिहासाला होळकर शाहीशिवाय पुर्तता होऊ शकत नाही. मल्हारराव होळकर या महान व्यक्तीने स्वता:च्या कर्तत्वावर राजकीय अस्तित्व निर्माण केले. उत्तर भारताच्या इतिहासातील मोगल बादशहाला हादरा देऊन दिल्लीच्या सिंहासनावर मराठेशाहीचा झेंडा फडकवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राजकीय विचारांचा वारस म्हणून मुलगा खंडेराव होळकर यांची पत्नी अहिल्याबाई होळकर यांच्याकडे सोपविली. एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. भारतिय इतिहासात प्राचीन काळापासून ते स्वातंत्र्यपुर्व काळा प्रयत्न पुण्यश्लोक ही उपाधी फक्त तीन व्यक्तीला बहाल करण्यात आली आहे. सर्व प्रथम भगवान श्रीक्रष्ण, त्यानंतर महाभारतातील तत्वनिष्ठ धर्मराज, आणि तिसऱ्या क्रमांकावर अठराव्या शतकात मराठेशाहीतील, अहिल्याबाई होळकर यांना बहाल दिसून येते. एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, किंवा त्यांचा जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.

**अहिल्याबाई होळकर यांचा जन्म व बालपण :**

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. अहिल्यादेवी यांचे आजोळ उस्मानाबाद जिल्ह्यातील चोराखळी हे गांव होते. त्यांच्या मामांचे आडनाव मैंदाड होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते.अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता.

**अहिल्याबाईचा विवाह :**

मराठा इतिहासातील माधवराव पेशवे यांना मल्हारराव होळकर यांचा धाडसीपणा, लढाऊ प्रवर्ती, पराक्रमीपना लक्षात घेऊन होळ येथील जहागिरी बहाल केली. मल्हारराव होळकर यांनी स्वताच्या कर्तत्वावर माधवराव पेशवे यांचे विश्वासू सरदार म्हणून ओळखले जाऊ लागले. पेशव्यांचे सरदार मल्हारराव होळकर हे माळवा प्रांताचे जहागीरदार बनले. ते पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. ऐतिहासिक आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. या मुलीचा स्वभाव, बाणेदारपणा, चिकाटी प्रव्रती, सुसंस्कृतपणा आवडल्यामुळे माणकोजी शिंदे यांच्याकडे मुलीची सुन म्हणून मागणी केली. या मागणीस माणकोजी शिदे यांनी होकार दिला.

हिंदू धर्मातील रितीरिवाजांप्रमाणे खंडेराव व अहिल्या यांचा विवाह वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी झाला. लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी.

**होळकर घराण्यातील प्रारंभीची जबाबदारी :**

लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. "चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुकाम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा… कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा." मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत.

**खंडेराव होळकर यांचे निधन :**

इ.स. 1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे माणून रयतेला कल्याणकारी राज्य दिले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

**अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वास मान्यता :**

मल्हारराव होळकर यांनी प्रारंभी पासून राजकीय धडे, भाला फेक, तलवार चलवने, दांडपट्टा चालवने यांचे प्रशिक्षण दिले होते. त्यामुळे शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात. मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

**दत्तक विधीस प्रेरणा :**

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला.

**न्यायालयीन कार्य :**

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होती त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले.

**लोककल्याणकारी कार्य :**

सासरा मल्हाररावांचा मृत्यू 20 मे 1766, मुलगा मालेरावांचा मृत्यू 27 मार्च 1767 मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, किंवा त्यांचा जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने उध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे - काशी, गया, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी ईत्यादी यादी आहे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी कलावंत आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

**चोर व दरोडेखोर यांचे मत परिवर्तन :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या.त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला.

**इतिहास अभ्यासकांची विवेचन :**

अहिल्याबाई होळकर यांनी नेहमीच अंधार संपवण्याचा प्रयत्न केला, त्यांनी आपले जीवन इतरांच्या भल्यासाठी समर्पित केले. एक काळ असा होता जेव्हा तिने पतीच्या निधनानंतर सर्वस्व सोडून देण्याचा निर्णय घेतला होता. पण त्यानंतर त्यांनी राज्य आणि धर्मासाठी सर्वस्व अर्पण केले. पाश्चात्या इतिहास अभ्यासक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारिट" असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारिट यांच्याशी एकत्रित केली आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया या ग्रंथात अहिल्यादेवी होळकर यांच्या बद्दल गौरव केला आहे.

अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र वाचल्यानंतर स्त्री शक्ती किती महान आहे, ती आपल्या आयुष्यात काय करू शकते याचे उदाहरण आपल्याला मिळेल. जीवनात कितीही संकटे आली तरी त्यांना कसे सामोरे जायचे हे अहिल्याबाईंच्या जीवनातून शिकले पाहिजे. अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या आयुष्यात खूप संकटांचा सामना केला पण त्यांनी कधीच हार मानली नाही. महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजराथेतील सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले.मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या.त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन !



# नेहरू चषक हॉकी स्पर्धेत रेजिमेंटल व डिफेन्स करियर अकॅडमी विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आझादीच्या अमृत मोहोत्सवा निमित्त जिल्हा क्रीडा कार्यालय व हॉकी अस्सोसिएशन औरंगाबादच्या वतीने आयोजित नेहरू चषक हॉकी स्पर्धेत मुलांच्या गटात डिफेन्स करियर अकॅडेमि शाळेनी तर मुलींच्या गटात रेजिमेंटल शाळेने विजेतेपद मिळविले.

विद्यापीठातील साईच्या आंतराष्ट्रीय दर्जाच्या हॉकी ऍस्ट्रो टुर्फ मैदावर आयोजित जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत डिफेन्स करियर अकॅडेमि शाळेच्या १५ वर्षा खालील मुलांच्या संघाने हॅप इंटर्नटनशनल शाळेवर १-० ने विजेतेपद मिळविले. डिफेन्स करियर अकॅडेमि शाळेच्या आरुष परचुरेने विजयी गोल केला. तर मुलींच्या १७ वर्षाखालील गटात रेजिमेंटल शाळेने युरेका शाळेवर १-० ने विजे मिळविला. रेजिमेंटल शाळेच्या जान्हवी बम ने गोल करत विजय मिळून दिला. डिफेन्स करियर अकॅडेमिला सादत खान व सय्यद नोमान तर रेजिमेंटल शाळेच्या संघाला संजय तोटावाड आणि अकबर खान यांनी प्रशिक्षण लाभले.

सकाळी स्पर्धेचे उदघाटन प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेकर घुगे यांच्या हस्ते झाले तर बक्षीस वितरण हॉकी महाराष्ट्रचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडा अधिकारी लता लोंढे, हॉकी संघटनेचे शेख साजीद, आझम शेख यांची प्रमुख उपस्तीथी होती. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हॉकी संघटनेचे सहसचिव शामसुंदर भालेराव यांच्या मार्गदर्शना खाली क्रीडा प्रबोधिनीचे हॉकी प्रशिक्षक इम्रान शेख, मोहम्मद वासिम, झाकीर यारखान यांनी परिश्रम घेतले.



# दोन पाऊल लोकांनी अन् दोन पाऊल ग्रामपंचायतीने पुढे यावे तरच गावचा विकास होईल : भास्करराव पेरे पाटील

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित आनंदगाव येथे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज



**दिनकर जाधव**

**केज :** गावच्या विकासासाठी लोकांनी दोन पाऊल पुढे यावं आणि ग्रामपंचायतीने दोन पाऊल पुढे यावे तरच गावचा विकास शक्य, असे मत पाटोदा गावचे आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी व्यक्त केले ते दि.१३ ऑगस्ट रोजी तालुक्यातील आनंदगाव (सा) येथील कार्यक्रमात व्याख्याते म्हणून बोलत होते. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमानिमित्त पाटोदा गावचे आदर्श सरपंच तथा शिल्पकार भास्करराव पेरे पाटील यांचे व्याख्यान गुरुवार दि. (१२) रोजी झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड, प्रमुख उपस्थिती युसूफवडगाव पोलीस स्टेशनचे प्रशिक्षणार्थी उपनिरीक्षक शेखर औटे, सरपंच गणेश राऊत, शिवाजी पोळ आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले, पैसे सर्वश्रेष्ठ नाही. राजकारणातून पैसा कमवायचा या उद्देशाने पुढे येऊ नका. मतदारांनी पैसा घेऊन मतदान करणे महापाप आहे. त्यातून गावाच्या पिढ्यान पिढ्या बरबाद होतील. युवकांनो आई-वडिलांची सेवा करा ग्रामपंचायतीचा कर भरला पाहिजे. कर भरल्यानंतर ग्रामपंचायत ने नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. निवडणुकीच्या काळात जात धर्म, पक्ष, पार्टी असा कोणताही कलुशीत मत डोक्यात न ठेवता जो गावाचं भलं करेल अशाच उमेदवाराला मतदारांनी निवडून दिले पाहिजे. एकमेकांचे मतभेद दूर करून मागे काय झालं हे न पाहता येणाऱ्या पिढीसाठी सर्वांना एकत्र येऊन काम केलं पाहिजे. गावात फळझाडे लावणे आवश्यक आहे. गावात स्वच्छता ठेवली पाहिजे. ती सर्वांची जबाबदारी आहे, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्तविक डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गोविंद गायकवाड यांच्यासह गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.



# CISF औरंगाबाद एअरपोर्ट इकाईकडून विमान प्रवासी, स्टाफ तथा विजिटर्सला तिरंगा झेंड्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य झाला. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या या पर्वानिमित्त देशभरात 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. यावेळी CISF औरंगाबाद एअरपोर्ट इकाईकडून विमान प्रवासी, स्टाफ तथा विजिटर्सला तिरंगा झेंड्याचे वाटप करण्यात येत आहे. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम ७५, नावीन्यपूर्ण कल्पना ७५ नवे संकल्प ७५, स्वातंत्र्योत्तर फलनिष्पत्ती ७५ आणि अंमलबजावणी ७५ अशा पाच आशय संकल्पना राबवल्या जात आहेत. त्याचबरोबर 'हर घर तिरंगा' (घरोघरी तिरंगा) या अभियानांतर्गत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान देशाभरात २० कोटींहून अधिक घरांवर तिरंगा फडकताना दिसणार आहे. 'हर घर तिरंगा' (घरोघरी तिरंगा), स्वराज्य महोत्सव कार्यक्रमांतून नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्यवीरांविषयी जाणीवजागृती केली जात आहे. या कार्यक्रमाचे च्या निमित्ताने CISF औरंगाबाद एअरपोर्ट चे प्रमुख डिप्टी कमांडेंट पवन कुमार यांच्या अधिपत्यखाली इकाईकडून विमान प्रवासी आणि स्टाफ तथा विजिटर्स ला जवळ पास एक हजार तिरांग्या झेंड्याचे वाटप करण्यात आले.



# वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज : उपवनसंरक्षक अशोक सोनकुसरे

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे, किंबहुना हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे, असे विचार पुसद वनविभागाचे उपवनसंरक्षक अशोक सोनकुसरे यांनी व्यक्त केले. येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाच्या वतीने स्वतंत्र्याच्या अमृत महोत्सव वृक्षारोपण कार्यक्रमाचे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ. माधवी दिनकर गुल्हाने होत्या. यावेळी पुसद वन विभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी प्रवीण राऊत, वन विभागाचे संतोष सरगर, आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल पाटील, पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी इंगळे, सय्यद उपस्थित होते. अशोक सोनकुसरे पुढे म्हणाले की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात पर्यावरण प्रदूषणाचे आव्हान नव्या पिढीपुढे उभे ठाकले आहे. प्रदूषण म्हणजे अनुरोग्याचा मोठा शत्रू तयार झाला आहे. त्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन याद्वारे प्रदूषणाच्या शत्रुवर मात करता येईल. त्यामुळे वृक्षारोपण-संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे विचार त्यांनी सांगितले. वनपरिक्षेत्राधिकारी प्रवीण राऊत यांनी मानवी जीवनातील वृक्षांचे महत्व सांगितले. शिक्षण घेताना अभ्यासासोबत वृक्ष संवर्धनावर विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे, असे ते म्हणाले.

**वृक्षाला बांधली राखी**

शाळेच्या आवारातील वृक्षांना भली मोठी राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यावेळी नव्या वर्गात शिकणारी अनाथ विद्यार्थिनी नंदिनी खंदारे हिच्या हस्ते वृक्षाला राखी बांधण्यात आली. तिने उपवनसंरक्षक अशोक सोनकुसरे यांना कुमकुम् तिलक करत राखी बांधली. शारीरिक व्यंगावर मात करत नंदिनी शिक्षण घेत आहे, तिचे कौतुक करत उपवनसंरक्षक यांनी तिच्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी उचलण्याचे जाहीर केले. यावेळी विद्यार्थिनींनी टाळ्यांचा मोठा गजर केला.

# साहेब... हो साहेब हक्काचं घरंच नाही तर झेंडा लावू कुठे

## भटकंती करणाऱ्या जोशी समाजाची सरकारला आर्त हाक

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** देशाला स्वातंत्र्याला ७५ वर्ष झालीत. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार अमृत महोत्सवी म्हणून हर घर तिरंगा या अभियानातून प्रत्येक घरावर १५ ऑगस्ट रोजी तिरंगा झेंडा फडकवण्याचे आवाहन केले आहे. परंतु भटक्या विमुक्त जाती जमातीतील गोरगरीब, वंचित घटक व भटकती करणाऱ्या समाजाला राहायला घरच नाही. अशा अवस्थेत या समाजबांधवांनी कुठे ध्वजवंदन करायचे, हा प्रश्न आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांचा कालखंड होत असून आजही गावो गावी नंदीबैल, वासुदेवाची वेशभुषा करून भटकंती करणारा भिकषा मागणारा जोशी समाज असेल किंवा फासेपारधी, कुडमुडे जोशी, कातकरी, लोहार, गोसावी किंवा वंचित घटकातील समाज बांधव विकासापासून वंचित आहेत. सर्वच राजकीय पक्षांकडून व राजकीय नेतेमंडळींनी जोशी समाजाला किंवा अन्य जातींना अंधारात चाचपडत ठेवण्याचे काम केले आहे.

महाराष्ट राज्यांसह संपुर्ण भारतात भटकंती करणारा हा समाज यातील अनेकांना आज सुध्दा हक्कांची घरे नाहीत जागा नाही रेशनकार्ड नाही हे नसल्यांने या समाजातील मुलं मुली आज पण शिक्षणापासून वंचित आहे. या समाजबांधवांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले आहे का, हा प्रश्न आहे. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार व राजकीय नेते व प्रशासनाला स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर सुध्दा या समाज्याची व्यथा मात्र समजलेली दिसत नाही. गावो गावी पोटाची खळगी भरण्यासाठी फिरणार्या या समाज्याला केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार या वंचित घटकातील समाज बांधवांना न्याय देतील कधी हे मात्र सांगता येत नाही.




# माणुसकीची भिंतच्या महिलांचे वृद्धाश्रमात रक्षाबंधन

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** बाबासाहेब नाईक वृद्धाश्रमात माणुसकीची भिंत महिला सदस्यांनी येथील वृद्धांसोबत त्यांना टॉवेल, टोपी देत राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. उपजिल्हा रुग्णालय पुसद येथील रुग्ण त्यांच्या नातेवाईकांना राखी बांधण्यात आली. तसेच त्यांना साड्या देण्यात आल्या.

माणुसकीची भिंतीच्या महिला सदस्यांनी रुग्णांना त्यांच्या नातेवाईकांना राखी बांधून त्यांना टावेल टोपी पेढा देऊन सर्वांना अन्नदान केले.

या उपक्रमात माणुसकीची भिंत महिला सदस्या मोनिका जाधव, अर्चना गावंडे, संजना राठोड, शिल्पा जाधव, रेखा आगलावे, मोना रावल, संध्या महल्ले, प्रियंका बेले, प्रेरणा गावंडे, ऋतिका आगलावे तसेच माणुसकीची भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव, संतोष गावंडे, जगत रावल, सदस्य पंकजपाल महाराज, दत्तात्रय जाधव, सोहम नरवाडे, आघाम भगत, संदीप आगलावे, आदित्य जाधव, स्वराज गावंडे, वैष्णवी जाधव, क्रिश जाधव, आगलावे, दीपक घाडगे आदी उपस्थित होते.



**घनसावंगी :** आवलगाव येथे आजादी का अमृत महोत्सव हर घर तिरंगा जनजागृती रॅली जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायतच्या वतीने काढण्यात आली. यावेळी सरपंच काकासाहेब कुऱ्हाडे, उपसरपंच विठ्ठल भालेकर, शालेय समितीचे अध्यक्ष कचरू थोरात, मुख्याध्यापक संजय जपे, माजी सरपंच मधुकर ठेंगडे, मा. उपसरपंच शेख समशेर, निलेश जोशी, हिवाळे, कुलकर्णी, जैवाळ, गजंम, अंगणवाडी सेविका, अशा वर्क्स, आदी उपस्थित होते.

# कन्नड गणेश महासंघ अध्यक्षपदी संदेश पवार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** गणेश महासंघ 2022 ची आज कार्यकारणी बैठक संस्थापक अध्यक्ष पवन सोनवणे यांच्या अध्यक्षखाली 2022 चे अध्यक्षपद संदेश पवार यांची निवड करण्यात आली तसेच कार्याध्यक्ष प्रकाश शिरसे, सचिव अनिल खंबात, स्वागत अध्यक्ष पवन ठाकुर, प्रल्हाद तायडे, कोषाध्यक्ष संदीप नरवडे, उपाध्यक्ष संतोष पवार, अविनाश कंनगरे, सोपान शिरसाठ, शंकर राउत, अमोल पवार, योगेश त्रिभुवन, सोमनाथ दाभाडे, अनिल गायकवाड तसेच महासंघाच्या निवड प्रमुख मार्गदर्शन युवा उद्योजक मनोज पवार, समितीचे सलागार माजी नगर अध्यक्ष विलास वाडेकर, याकूब शेख, मनोज देशमुख, सुरेश डोळ्स, पाढुरंग घुगे, सुनील निकम, शाम महाले, सुभाष शेजवल, डॉ. सदाशिव पाटिल, सिद्धार्थ निकालजे, योगेश पाटिल, गणेश निकम, संजय शिंदे, अनिल हड़ोळे, संदीप चेनई, रवि शिंदे, युवराज चव्हाण, तसेच सर्व गणेश भक्त यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली.

# भीम बुद्ध सिल्वर सेवाभावी संस्थेतर्फे नारळी पौर्णिमा साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील महामाया शुद्धोधन कॉलनी जल गंगा हो, सो. जवळ श्रावण पौर्णिमा साजरी करण्यात आली. तथागत भगवान गौतम बुद्ध भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर च्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून दीप प्रज्वलन करून खिरदान वाटपासह कार्यक्रम कामिनी भूषण पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाला सुरुवात झाली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवर भीम बुद्ध सिल्वर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राजेंद्र पवार सचिव रेखाताई पवार, विमलताई बेडसे, शैलाताई केदार, आशाताई देवरी, आम्रपाली पवार, प्रवीण मोरे, मनोहर निकम, रवींद्र सरदार, कपिल देवरे, गोरख बैसाणे, अमोल खैरनार, दीपक कोळी, नितीन जमदाडे, दिनेश जगताप, रामभाऊ, राजू बाबा पवार आदी उपस्थित होते.

# सावळदबारा येथे महाराजस्व अभियान अंतर्गत शासन आपल्या दारी

## सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांच्याकडून "हर घर तिरंगा"घर घर तिरंगा ग्रामस्थांना केले मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा, नादांतांडा, देव्हारी, घाणेगांव तांडा, डाभा, फर्दापूर व सावळदबारा येथे हारे हारेश्ववर विठ्ठल रुखमिणी मंदीरावर ग्रामपंचायत अंतर्गत शासन आपल्या दारी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत, पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी घर घर झेंडा, हर घर झेंडा विषयी ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. "आजादी का अमृत महोत्सव" निमित्त जशे गुढीपाडव्याच्या सण गुढी उभारुन साजरा करतो त्याच प्रमाणे आपल्या घरावर तिरंगा ध्वज लावावा आणि त्यांचे तीन दिवस रक्षण करणे गरजेचे आहे.



आज आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षें पूर्ण झाले आहे. म्हणून तीन दिवस आनंद उत्सव साजरा करा, अशी माहिती तहसीलदार रमेश जसवंत यांनी सांगितले. "हर घर तिरंगा" येत्या तेरा व पंधरा ऑगष्ट या कालावधीत प्रत्येक घराघरात तिरंगा फडकवणारा उपक्रम भारतात आहे. सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत, गटविकास अधिकारी, कृषी विभागाच्या यांच्या मार्गदर्शनाखाली "हर घर तिरंगा" हि मोहीम अशा प्रकारे जनजागृती करण्यात आली. तसेच याप्रसंगी सोयगाव कृषी विभागामार्फत हेमंत देशमुख पर्यवेक्षक, मानसिंग भोळे यांनी शेतकऱ्यांना "ई-पिक" पाहणी शेतकऱ्यांनी कशी करावी त्यापासून होणारे फायदे या विषयावर शेतकऱ्यांना सकोल असे मार्गदर्शन केले. आणि उद्यापासून तीन दिवस "आजादी का अमृत महोत्सव" निमित्त हर घर तिरंगा घर घर तिरंगा म्हणून आनंद उत्सव साजरा करावा असे आवाहन सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांनी सावळदबारा व परिसरातील नागरिकांना केले.

दि.१३ ते १५ ऑगस्ट हे तीन दिवस घर घर तिरंगा हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.

याप्रसंगी सुत्रसंचालन प्रा.जीवन कोलते (सामाजिक) यांनी केले. यावेळी सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, ग्रामसेवक सुधीर भालेराव, डॉ. व्ही.पी.राजपूत, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मयूर सोनटक्के, सावळदबारा परिसरातील सरपंच, उपसरपंच, शिक्षकवर्ग, अंगणवाडी सेविका, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून "हर घर तिरंगा" शासन आपल्या दारी या उपक्रमात सहभागी झाले होते.



# शिवना येथे अण्णाभाऊंची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**शिवना :** सिल्लोड तालुक्यातील शिवना गांवी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उदघाटक सरपंच रघुनाथ वाघ व मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व ध्वजारोहन करुन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली होती. अण्णाभाऊ यांनी केलेला लढा हा समाजासाठी एक नवी प्रेरणा आणि दिशा देणारा असून सर्वांनी तो अंगिकारला पाहिजे असे प्रतिपादन यावेळी कार्यक्रमाचे वक्ते तथा मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी आपले विचार व्यक्त करतांना केले.

याप्रसंगी व्यासपीठावर जि.प.सदस्य गजानन राऊत, पं.स.सदस्य शेख सलीम, ग्रामपंचायत सदस्य अरुण पा.काळे, शिवसेना विभागप्रमुख रामेश्वर काळे, प्रसिद्ध व्यापारी राजु बाबा काळे, ग्रा.पं.सदस्य अजीम कुरेशी, ग्रा. पं. सदस्य नामदेव सुरडकर, इस्माईल कुरेशी, संजय साळवे, ज्ञानेश्वर जगताप, मातंग समाजाचे नेते अशोक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सखाराम आहिरे, अनिल सुरडकर, भरत मानकर, सुरेश चंदनशिव, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कैलास मोरे, उपाध्यक्ष अर्जुन मानकर, सचिव योगेश मानकर, आकाश मानकर, मंगेश मानकर, कचरू मानकर, राजु मानकर, सागर मानकर, किशोर सातफळे, अरुण काकफळे, नर्मदाबाई मानकर, लक्ष्मीबाई मानकर, रेखाबाई मोरे, ललिता मानकर, संगीता मानकर, सुनिता मानकर, अंगणवाडी सेविका कुसुमबाई जगताप, गुंफाबाई साळवे, आशाबाई पगारे, कांताबाई जगताप, ताराबाई जगताप, रेखाबाई मोरे आदींसहित असंख्य समाजबांधवांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते तथा वेणूताई वृद्धाश्रमाचे अध्यक्ष साहेबराव दणके यांनी केले, आभार उपाध्यक्ष अर्जुन मानकर यांनी मानले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



# कन्नड तालुका छायाचित्रकार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी दिलीप केवट यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुका छायाचित्रकार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी दिलीप केवट यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. शहरातील मंगल कार्यालयात मावळेते अध्यक्ष नितीन लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली तर जेष्ठ छायाचित्रकार मुस्तफा हुसेन, पवार काका यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या संघटनेच्या बैठकीत नवनियुक्त कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यात दिलीप केवट यांची अध्यक्षदी तर उपाध्यक्षपदी विलास शिंदे यांची निवड करण्यात आली.

यावेळी दिलीप केवट म्हणाले कि छायाचित्रण म्हणजे निव्वळ प्रतिमा उमटविणे नव्हे तर छायाचित्रकार याने समाजाचा आरसा बनून काम केले पाहिजे. वर्षभर विविध सामाजिक तसेच व्यवसायिक प्रशिक्षण आणि उपक्रम राबविणार असल्याचे मत नवनियुक्त अध्यक्ष दिलीप केवट यांनी व्यक्त केले. उर्वरित कार्यकारिणी पुढील प्रमाणे कोषाध्यक्ष रामेश्वर मोरे, सचिव महेंद्र काशिनद, सहसचिव श्रीकृष्ण बड़ग, सदस्य अविनाश डेंगड़े, लक्षण राठोड, मच्छिन्द्र शेजवळ, नितिन राठोड, पदम अंदोरे, विनोद मैराल, लकी पैठने आदींची निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष नितीन लोंढे, मुस्तफा हुसेन, पवार काका यांनी मार्गदर्शन केले. यावेळी हेमंत गेंगे, किसन माळी, गोरख जाधव, नितीन दराडे, साईनाथ जाधव, किशोर प्रधान, रघुनाथ काळे, राजेंद्र सोनवणे, देवेद्र सोनवणे, कृष्णा डहाके, भावलाल राठोड, स्वप्नील निकम, सचिन पवार, सौरव वाघ, निळ साहेब, किशोर खरात आदींची उपस्थिती होती. आभार लकी पैठणे यांनी मानले.



बीड जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी बहिणींना रक्षाबंधनाची भेट तिरंगा ध्वज दिला. यामुळे रक्षाबंधनालाही अमृत महोत्सवाचे स्वरूप आले.

# महावितरणच्या बक्षीस योजनेत शशांक गोळेगावकर यांना इलेक्ट्रिक स्कूटरचे बंपर बक्षीस तर रेखा नखाते यांना फ्रीज



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणने मराठवाड्यातील घरगुती वीजग्राहकांसाठी सुरू केलेल्या बक्षीस योजनेची दुसरी सोडत शुक्रवारी (१२ ऑगस्ट) काढण्यात आली. त्यात नांदेडचे शशांक गोळेगावकर हे प्रादेशिक स्तरावरील इलेक्ट्रिक स्कूटरच्या बंपर बक्षिसाचे मानकरी ठरले तर तर बीडच्या रेखा नखाते यांना रेफ्रिजरेटरचे विशेष बक्षीस मिळाले.

मराठवाड्यातील घरगुती ग्राहकांना वीजबिले देय दिनांकाच्या आत भरण्याची सवय लागावी यासाठी जूनपासून ही योजना सुरू आहे. या योजनेची दुसरी ऑनलाईन सोडत औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते काढण्यात आली. याप्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता भुजंग खंदारे, उपमहाव्यवस्थापक प्रवीण बागूल, अधीक्षक अभियंता उत्क्रांत धायगुडे, संजय सरग, मोहन काळोगे, अर्शदखान पठाण, प्रभारी महाव्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली, प्रणाली विश्लेषक मनीषा निफाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.गोंदावले म्हणाले की, बक्षीस योजना सुरू केल्यानंतर जूनच्या तुलनेत जुलैमध्ये वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांची संख्या एका लाखाने वाढली आहे. वेळेत व ऑनलाईन वीजबिल भरल्यास विविध सवलती मिळतात. त्याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा. वेळेवर वीजबिल भरून ग्राहकांनी देशाच्या प्रगतीला हातभार लावावा, जेणेकरून ग्राहकांना अधिक सेवा देण्याची प्रेरणा महावितरणला मिळेल. परिमंडल पातळीवरील एलईडी टीव्हीचे बक्षीस राम हरपाळे (औरंगाबाद), शिवाजी बिंदू (माजलगाव जि.बीड) व भालेराव (नांदेड) यांना जाहीर झाले. याशिवाय मंडल पातळीवरील ९ मोबाईल विजेत्यांची, विभाग स्तरावरील २२ मिक्सर विजेत्यांची व उपविभाग स्तरावरील एक हजार रुपयांपर्यंतच्या २०२ विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली. विजेत्या ग्राहकांना घरी जाऊन ही बक्षिसे देण्यात येणार आहेत.

सोनवळकर यांना स्कूटर प्रदान

जून महिन्याच्या सोडतीत बंपर बक्षीस मिळवणारे लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील ग्राहक बालाजी सोनवळकर यांना सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांच्या हस्ते इलेक्ट्रिक स्कूटर सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. तसेच जुलैच्या बंपर बक्षिसाची सोडतही त्यांच्या हस्ते काढण्यात आली. यावेळी सोनवळकर यांनी महावितरणने दिलेल्या बक्षिसाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. इतर घरगुती ग्राहकांनीही वेळेवर वीजबिल भरून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.


आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर घर संसार
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# 'महावितरण'ची वाढती बेबंदशाही !

## जनसामान्यांचे काय? याचा प्रत्यय तहसीललाही..

आधुनिक केसरी न्यूज

**सत्य कुटे**

**चिखली :** महावितरण कंपनीच्या अंदाधुंद कारभारामुळे ग्राहकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. कायम ग्राहकांच्या समस्येकडे दुर्लक्ष, अवाजवी बिल व विद्युत चोरांचे खापर मात्र सर्वसाधारण ग्राहकांच्या डोक्यावर फोडण्यासाठी कुप्रसिद्ध असलेली महावितरण कंपनी ही सध्या ग्राहकांना योग्य सेवा न देता जणू बेबंदशाही गत मनमानी कारभार करीत असल्याचे चित्र तहसील कार्यालय परिसरात लोमकळत असलेल्या विद्युत तारांनी स्पष्ट झाले आहे. तहसील कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्यातील नागरिकांच्या आडीअडचणी, समस्या सोडवून नागरिकांना न्याय देतात, त्यांच्याच तक्रारीला आता महावितरण केराची टोपली दाखवत, पोकळ आश्वासने देत झुलवत आहेत. तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांनाही महावितरण जुमानत नसल्याने महावितरणच्या या बेबंदशाही ला आता आवर कोण घालणार? असा संतप्त सवाल जनमानसात निर्माण होत आहे.



याबाबत वृत्तांत असा की, चिखली तहसील कार्यालय व्हरांड्यात ध्वज खांब व पार्किंग स्टँडच्या मध्यभागी तहसील कमानीला लागून असलेला लोखंडी विद्युत खांब वाकल्याने तहसील कार्यालयात विद्युत वाहक तार दोन्ही बाजूने झुकल्या गेली आहे. या विद्युत प्रवाहीत तार जमिनीपासून सात ते आठ फुटावर आलेली आहेत. तर एका बाजूने विद्युत तारावर वेली चढल्याने संभाव्य जीवितहानी किंवा भयंकर दुर्घटनेची शक्यता वाढते आहे. तहसीलदार अजितकुमार येळे यांनी संभाव्य परिस्थिती पाहता विद्युत महावितरण चिखली व बुलडाणा कार्यालयास रीतसर पत्र व्यवहार करून खांब बदलण्याचे, वेली व झुडपांच्या विळख्यात गुंतलेली विद्युत वाहक तार मोकळी करावे, असे पत्राद्वारे कळविले आहे.

याबाबत पंधरा दिवस होऊनही महावितरण कार्यालयाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नसून, परत टपाली पाठविलेल्या पत्रात असे नमूद केले की, तहसील कार्यालयाने स्वखर्चाने विद्युत पुरवठा करणारे लोखंडी खांब कंत्राटदारांकडून बदलून घ्यावे, असे पत्र पाठवून महावितरण मोकळे झाले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू आहे. उद्या स्वातंत्र्यदिनाची मंगल पहाट उदयास येणार आहे. ज्या ठिकाणी राष्ट्रध्वज फडकाविला जाणार आहे, त्याच ठिकाणी तार खाली लोमकळली आहेत.

तहसील कार्यालय व इतर ठिकाणी वाढलेली झाडी, झुडपे, वेली पाहून असे निदर्शनात येते की, दरवर्षी महावितरणकडून शहरातील विद्युत खांब व ताराला अडसर ठरणारी झाडी, झुडपे, फांद्या, वेली लाखो रुपये खर्च करून फक्त कागदोपत्रीच तोडली जातात का? आजपर्यंत महावितरण कंपनीमुळे सर्वसाधारण ग्राहक, शेतकरीच त्रस्त होते आता तर चक्क तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय महावितरणच्या रडारवर आल्याने स्वतः तहसील कार्यालय जर महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्रस्त असेल तर सर्वसाधारण ग्राहक व शेतकरी यांचे हाल न सांगणे बरे. विद्युत खांब सरळ करणे, खांबावरील इतर अडचणीचा निपटारा करणे, लोमकळलेली तारे व्यवस्थित करणे, विद्युत प्रवाहला अडथळा निर्माण करणारी आवश्यक ती झाडे, फांद्या, झुडपे व वेली तोडणे हे महावितरण कंपनीचे कर्तव्य असतांना, अशाा निर्ढावलेल्या महावितरण कंपनी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य दंडात्मक कारवाई होईल का? येत्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला विद्युत तार, वाकलेला लोखंडी खांब व तारावर चढलेल्या वेलीची समस्येतून तहसील कार्यालयास स्वतंत्र मिळेल का? असा सवाल निर्माण झाला आहे.

# उत्तमराव खोब्रागडे यांचा आज परिसंवाद

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** आज दि. १४ ऑगस्ट रोजी माजी भा.प्र.से. उत्तमराव खोब्रागडे यांचा स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला 'लोकशाही' या विषयावर औरंगाबादच्या होल्डिंग हॅन्ड्स बहुउद्देशीय संस्थेने महात्मा गांधी स्मारक, शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला समर्थ नगर येथे संध्याकाळी चार वाजता परिसंवाद आयोजित केला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ऋषिकेश कांबळे असतील, अशी माहिती होल्डिंग हॅन्ड्स बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर यांनी दिली आणि जास्तीत जास्त नागरिकांनी या परिसंवादाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

# हुंडा पद्धत समाजातील लोभिष्ट माणसाच्या मनोवृत्तीचा आरसा : काळे

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** हुंडा एक सामाजिक समस्या आहे. हुंडा पद्धती म्हणजे समाजातील लोभिष्ट स्वभावाच्या माणसाच्या वाईट मनोवृत्तीचा आरसा आहे, असे प्रतिपादन देव्हारीचे ग्रामसेवक सुरेश काळे यांनी माहिती दिली आहे. या हुंडाबळीमुळे स्त्रियांवर नेहमीच अत्याचार होताना दिसत आहे.

पुढे बोलताना सुरेश काळे म्हणाले की, हुंडा प्रथेबद्दल समाजाची असणारी मानसिकता व हुंडाबळी कायद्यात असलेल्या कमतरता याविषयी सविस्तर माहिती असणे गरजेचे आहे. भारतात आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे. एका बाजूला गडगंज संपत्ती असणारे भांडवलदार आहेत; तर दुसऱ्या बाजूला अन्नाची भ्रांत असणारे लक्षावधी गरीब आहेत. एका बाजूला उंच उंच आलिशान इमारती आहेत, तर दुसऱ्या बाजूला हीनदीन झोपडपट्ट्या आहेत. अशा या दोन परस्परविरोधी समाजांत एका बाबतीत मात्र साम्य आहे आणि ती बाब म्हणजे 'हुंडाबळी'. श्रीमंतांकडे ज्याप्रमाणे हुंड्यासाठी बळी पडतात, त्याप्रमाणे गरिबांच्यातही हुंड्यामुळे खून केले जातात. हुंड्याचे हे जहर आज पिढ्यान्पिढ्या आपल्या समाजात भिनले आहे. त्यामुळे मुलगी झाली की आईवडिलांच्या काळजाचा ठोका चुकतो. मुलीला जन्म देणाऱ्या स्त्रीकडे उपेक्षेने पाहिले जाते. कित्येक गरीब घरांतून तर या हुंड्याच्या रूढीपायी कित्येक मुली अविवाहित राहतात, असे देव्हारी ग्रामपंचायत चे ग्रामसेवक सुरेश काळे यांनी सांगितले आहे.

समाजातील लोकांची हुंड्याची हाव सुटण्याची आवश्यकता!

हुंडा ही लग्नाच्या वेळी मुलाकडून किंवा मुलीकडून विरुद्ध बाजूच्या कुटुंबाला देण्यात येणारी भेट आहे. ही भेट पैसे, मालमत्ता किंवा वस्तू सोने स्वरूपात घेतली जाते. भारतात हुंड देने किंवा घेणे दोन्ही बेकायदेशीर आहे. हुंडाचा अर्थ आहे जी संपत्ती, लग्नाच्या वेळी वधूच्या कुटुंबा तर्फे वरला दिली जाते. त्याला हुंडा असे म्हणतात. यासाठी सामाजातील लोकांची हुंड्याची हाव सुटण्याची आवश्यकता आहे.

# वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानचे कृषी पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान वतीने १८ ऑगस्ट रोजी बा.ना. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सुधाकरराव नाईक सभागृहात दुपारी १२ वाजता कृषी गौरव पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सार्वजनिक आरोग्यमंत्री आमदार राजेश टोपे तर प्रमुख अतिथी हवामान पंजाबराव डख यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील कर्तबगार व प्रयोगशील शेतकरी व कृषी शास्त्रांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल शाल, श्रीफळ, स्मृती मानचिन्ह, प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार प्राप्त शेतकरी प्रियदर्शनी विलास मानकर तळेगाव दाभाडे जि. पुणे (गुलाब उत्पादक महिला शेतकरी), संदीप मेश्राम घोळे पाटस ता.दौड़ जि.पुणे (कांदा वाण संशोधक शेतकरी), आनंद शिदे आनंद कृषी पर्यटन केंद्र बोरगाव ता.जि. सातारा (कृषी पर्यटन), नितीन बाबुराव सावंत, जागणी ता. जि.उस्मानाबाद (सफरचंद व ड्रॅगन फ्रुट उत्पादक शेतकरी) अनुप भगवानराव मोरे, मुदखेड जि.नांदेड (सोयाबीन हळद उत्पादक शेतकरी), उत्तर महाराष्ट्र दीपक माणिक पाटील, माचला ता. चापडा



जि.जळगाव (विक्रमी केळी व कापूस उत्पादक शेतकरी), कोकण देवराई कृषी समूह मु.पो. कर्ली (देवरुख) ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी (सामुहिक बागायती यशस्वी मॉडेल), विदर्भ प्रवीण भगवानदास गट्टाणी (सिताफळ, पेरू, आंबा फळबाग), श्री संत खप्ती शेतकरी पुरुष बचत गट, वेणी खुर्द ता.पुसद जि.यवतमाळ (मिनी दालमिल, सेंद्रीय दाळीचे पॅकीन विक्री), अमोल बाबुराव बोडखे, लोणी ता. पुसद जि.यवतमाळ (विक्रमी टरबुज उत्पादन), कृषी शास्त्रज्ञ डॉ. मनोज दिलीप माळी, हळद संशोधन केंद्र, कसबे डिग्रज जि. सांगली, डॉ शिवाजी पांडुरंग म्हेत्रे, सोयाबीन पैदासकार, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी. दुपारच्या सत्रात ३ वाजता डॉ. मिलींद कदम हे हळद पीकावर मार्गदर्शन करतील. यावेळी सत्कारमूर्ती शेतकऱ्यांचे अनुभवकथन होईल. या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान समितीने केला आहे.

# शिवाजी विद्यालयात राष्ट्रगान व ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील आज जयकालिंका देवी शिक्षण संस्था सावळदबारा संचलित शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व कै. लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने 75 व्या भारत स्वातंत्र्य च्या अमृत महोत्सव निमित्त "हर घर तिरंगा" उपक्रमात अंतर्गत आज शासनाच्या परिपत्रकानुसार सकाळी 7:30 वाजता शाळेच्या क्रीडांगणमध्ये राष्ट्रध्वज फडकवून समूह राष्ट्रगाणं घेण्यात आले.



याप्रसंगी संस्था अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते यांनी सर्वांना मार्गदर्शन केले व भारतातील शूरवीर हुतात्मे व स्वातंत्र्यवीर यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कशाप्रकारे आपले विचार व कर्मातून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. याबद्दल मार्गदर्शन केले. नंतर शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या विचारावर आपण मार्गक्रमण करावे असे सांगितले. याप्रसंगी प्राचार्य नारायण कोलते यांनी सांगितले. यावेळेस संस्था सचिव श्रीमती रत्नाताई नारायणराव कोलते व संचालक मंडळ उपस्थित होते.

प्रत्येकाने तिरंगा ध्वज आपल्या घरावरती लावावा व त्याची जबाबदारी स्वता करावी व हा अमृत महोत्सव अगदी आनंदात व शांततेत पार पाडावा हीच खरी भारतासाठी स्वातंत्र्य दिलेल्या हुतात्म्यांना व शहीद जवानांना आपल्याकडून श्रद्धांजली राहील, असे प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

यावेळेस शाळेतील सर्व शिक्षक विजयसिंग राजपूत, सुदाम राठोड, विनोद जाधव, भास्कर खमाट, मुकुंदा व्यवहारे, श्रीकृष्ण सोनवणे, भास्कर ससाने, संजय जोशी, विकास पाटील, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव सोनवणे, भूषण देसले, श्याम जाधव, अजबराव चव्हाण, पंजाबराव शेळके, सतीश गावंडे, दिलीप सिसोदे, अजय रबडे, योगेश थोटे, गणेश मोहने, सुनिल कुमार चव्हाण, सतीश खवले, मोहन बोरे, योगेश शेळके, गजानन चव्हाण, बाबासाहेब कोलते, सतीश सत्रे, राहुल बडक, संदीप कोलते, पडोळ सर, राठोड योगेश, प्रदीप पाटील, शिक्षक बंधू व विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती प्राचार्य एन.आर. कोलते यांनी बोलताना दिली.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
पाने ५३४
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
पाने ५३४
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
पाने ३६४
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# आर्य चाणक्य च्या १४०४ विद्यार्थ्यांनी साकारला भारताचा नकाशा व तिरंगी ध्वज

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अमृत महोत्सवानिमित्ताने भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथील क्रीडांगणावर अलौकिक व भव्य अशी भारताचा नकाशा व तिरंगी ध्वज विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून साकारण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. ध्वजारोहण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नंदकिशोर मालाणी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. राष्ट्रध्वजाला सलामी देत ढोल ताशाच्या गजरात सामूहिक राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे १४०४ विद्यार्थ्यांना तीन रंगांच्या टोप्या वितरित करून तिरंगी भारताचा नकाशा व तिरंगी ध्वजाची भव्य प्रतिकृती शाळेच्या क्रीडांगणावर उभारण्यात आली होती. भव्य अशा प्रतिकृतीने उपस्थितांचे मन भारावून गेले होते. सदरील प्रतिकृती सुदाम पोल्हारे, सर्फराज अंबेकर, सुभाष लोंढे, राखी धोकटे, सचिन सूर्यनारायण, बाळू लाड, शुभांगी सदावर्ते, विकास देशमुख यांनी सर्व शिक्षकांच्या सहकार्याने, मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली उभारली होती. भारत विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. राम लोंढे यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. या समवेतच विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धेचे आयोजन राखी धोकटे, प्रियंका निकाळजे यांनी केले तर निबंध स्पर्धेचे आयोजन अर्चना गिरवलकर, कीर्ती तुपकर यांनी केले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, प्रमुख पाहुणे नंदकिशोर मालाणी, जुगलकिशोर लोहिया, विजय चाटूपळे, शिवाजी मारवाडी, डॉ. राम लोंढे, रविंद्र साळजोशी, रेणुकादास गर्गे, अ‍ॅड. पटवर्धन, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ज्योती जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब भापकर, शिवराज धनसुरे, विलास खर्डेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद काकडे यांनी केले.






# सरकार विरोधकांशी दुजाभाव करीत आहे

## अशोक चव्हाण यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यावर विकासाचा अजेंडा घेऊन लोकाभिमुख कामे मार्गी लावली आहेत. आताचे सरकार केवळ आश्वासने देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे. आम्ही सध्या विरोधी बाकावर असल्याने आमची कामे, निधीला ब्रेक लाऊन सवतीची वागणूक देत आहेत असा आरोप माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शनिवारी (ता.१३) केला आहे.

भोकर-नांदेड रस्त्यावरील गणराज रिसोड सभागृहात "आझादि गौरव पदयात्रा" निमित्त जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर गोविंद शिंदे नागेलीकर, मारोती कवळे, सुरेंद्र घोडजकर, सौ.मंगाराणी अंबूलगेकर, पप्पू पाटील कोंडेकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, प्रकाश देशमुख भोसीकर, नागनाथ घिसेवाड, गोविंद पाटील गौड, भगवान दंडवे, विनोद पाटील चिंचाळकर, बाबूराव आदंबोरीकर, रामचंद्र मुसळे, प्रताप देशमुख बारडकर, संजय बरकमकर, केशव पाटील पोमनाळकर, खन्ना पाटील चिंचाळकर, गंपू पाटील, सुभाष किन्हाळकर, विठ्ठल धोंडगे, सुलोचनाबाई ढोले, सुरेखा माळे, कमल नर्तावार याची ऊपस्थिती होती.

चव्हाण म्हणाले की, देशाला ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी भगतसिंग, राजगुरू, महात्मा गांधी, टिळक, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा थोर महापुरुषांनी लढा उभारला. मराठवाडा मुक्ती संग्राम, मुंबईतील गांधीजीचा सत्याग्रह, देशाला मिळालेलं स्वातंत्र्य याच स्मरण व्हावे म्हणून भारतीय अमृतमहोत्सवा निमित्ताने पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. येणाऱ्या युवा पिढीने हि वीरगाथा समाजात रूजवणे गरजेचं आहे. मराठवाड्यातील अनुशेष भरून काढण्यासाठी मी सत्तेत असो अथवा नसो विधीमंडळात आवाज उठवून जनतेला न्याय मिळवून देणार आहे, असे सांगितले आहे. सभेपूर्वी शहरातील प्रमुख मार्गावरून भोकर तालुका काँग्रेस कमेटीच्या वतीने पदयात्रा काढण्यात आली. त्या यात्रेत सहभाग घेऊन यात्रा यशस्वी केली आहे. मनोज गीमेकर यांनी सुत्रसंचलन केले. जगदीश पाटील भोसीकर यांनी आभार मानले. सभेला बहुसंख्य नागरीकांची उपस्थिती होती.

**भारत जोडो अभियानाचे आयोजन**

राहुल गांधी यांनी सप्टेंबर महिन्यात कन्याकुमारीपासून काँग्रेस पक्षाच्या वतीने भारत जोडो अभियानाची सुरुवात करणार असून ऑक्टोंबर महिन्यात लगतच्या तेलंगणा राज्यातून महाराष्ट्रातील देगलूर, नायगाव, नांदेड मार्गे जाणार आहेत. या अभियानाची पूर्व तयारी आतापासूनच करण्यात येत आहे. जनतेशी अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन अशोक चव्हाण यांनी केले आहे.

# घर घर तिरंगा उपक्रमात सहभागी व्हावे : मो.आरिफ मो.लुखमान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात येथील नागरिकांनी घर घर तिरंगा उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान यांनी केले.



नागरिकांना योग्य दरामध्ये झेंडा विकत घेता यावा यादृष्टीने सावळदबारा ग्रामपंचायत कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या तिरंगा झेंडा विक्री केंद्राचा शुभारंभ सरपंच महिला सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, ग्रामसेवक सुधीर भालेराव व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते करण्यात आला व सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक सुधीर भालेराव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य, व ग्रामपंचायत कर्मचारी सर्व शिक्षकवर्ग, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ आदींची उपस्थिती होती. या "हर घर तिरंगा" उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान यांनी केले आहे.




# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मुला व मुलींना बेल्ट व टाय वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नक्षत्रवाडी औरंगाबाद येथील संत कबीर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा आयु. विठाबाई माधवराव बोरडे, सचिव अ‍ॅड. धनंजय माधवराव बोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.13 रोजी संत कबीर विद्यालय येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व संत कबीर शिक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कालकथित शिक्षणमहर्षी माधवराव बोरडे यांच्या जयंती निमित्त संत कबीर विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक पवार एस. बी. यांनी स्वखर्चाने विद्यालयातील सर्व 800 मुला व मुलींना बेल्ट व टाय यांचे वाटप केले.

कार्यक्रम अतिशय उत्साहात व जल्लोषात साजरा झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कादरी आय.व्ही. यांनी केले व आभार नीळ ई.बी. यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

एस.टी.डी. म्हणजे सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीजेस, याला आपण सेक्समुळे पसरणारे आजार असं थोडक्यात म्हणू शकतो. सर्वप्रथम आपण या आजारांची नावं जाणून घेऊयात.

* एच.आय.व्ही. एड्स * हिपॅटायटीस * शैकरॉईड * ट्रायकोमोनियासिस * ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही) व जेनियल वार्टस * हार्पिस * गोनोरिया * क्लेमायडिया * बॅक्टेरियल * व्हजायनायटीस (बी.व्ही.) * सिफिलीस * स्कॅबीज * प्युबिक फ्रेंच लाइस * पेल्व्हिक इन्फलमेटरी डिसीज (पीआयडी) * म्युको पुरुलंट सिस्यटायटीस (एमपीसी) * मॉल्युसकम कंटॅजीओजम * लीफो ग्रॅन्युलोमा व्हेनेरम (एलजीव्ही)

**एस.टी.डी. म्हणजेच सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीजेस**

आता आपण एस.टी.डी. या प्रकारात येणाऱ्या अन्य आजारांबद्दल जाणून घेऊया.

**सिफिलीस :** स्त्री-पुरुष संबंधांमध्ये उघड्या अंगाना स्पर्श झाल्यामुळे या रोगाचा संसर्ग होतो. जर वेळीच यावर उपाय केला नाही तर त्याचे रूपांतर गंभीर समस्येमध्ये होते. उदा. मेंदू व मज्जासंस्था यावर परिणाम होणे. रक्तामध्ये जंतू संसर्ग होणे आणि त्यामुळे मृत्यू होणे. यु एस ए (अमेरिका) मध्ये याचे प्रमाण जास्त आढळते आणि त्याचे प्रमुख कारण आहे समलैंगिक संबंध (होमो सेक्स).

**लक्षणे :** या आजाराची सुरुवातीची लक्षणं म्हणजे लहान व न दुखणाऱ्या जखमा होणे, या जखमा प्रामुख्याने योनी, लिंग, तोंड आणि गुदद्वार यामध्ये होतात. पुढची लक्षणे म्हणजे शरीरावर तळवे व तळहाताला रेंश येतात. तसेच इतर लक्षणांमध्ये ताप येणे, गाठी, घाम येणे, केस जाणे, डोकेदुखी, वजन कमी होणे, स्नायू दुखणे आणि थकवा येणे अशी लक्षणे आढळून येतात. गर्भावस्थेमध्ये स्त्रीला सिफिलीस झाला तर बाळ दगावते. याचा प्रसार हा योनी, ओरल व ॲनल सेक्स, ओठ, तोंड येथील जखमांमुळे होतो.

**निदान आणि उपचार**

रक्त तपासणी तसेच जखमेच्या स्थानाची चाचणी यातून या आजाराचे निदान करण्यात येते. उपचारांमध्ये पेनिसिलीन इंजेक्शन आणि प्रतिजैविक (ॲन्टबायोटिक्स) उपलब्ध आहेत.

**प्रतिबंध :** सेक्स न करणे हा खरं तर प्रतिबंधात्मक उपायांमधील सर्वात मुख्य उपाय आहे पण सेक्स ही एक निसर्गदत्त भावना असल्यामुळे हे शक्य नाही. त्यामुळे असे आजार होऊ नयेत यासाठी एकच सेक्स पार्टनर असणे जो पूर्णतः निरोगी आहे आणि सेफ सेक्स करणे म्हणजेच सेक्स करताना कंडोमचा वापर करणे हे प्रतिबंधात्मक उपाय सांगता येतात.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## भंडारदरा धरण ओव्हरफ्लो

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्ह्याची तहान भागवणारे भंडारदरा धरण तुडूंब भरले आहे. उत्तर नगर जिल्ह्यातील शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याची गरज भंडारदरा धरण भागवते. दरवर्षी १५ ऑगस्टला हे धरण ओव्हरफ्लो होते. यावर्षी धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असल्याने भंडारदरा धरण तुडूंब भरले आहे. स्पिलवे गेटजवळील भिंतीवरून धरणातील पाणी उसळ्या मारून बाहेर पडण्याचा प्रयत्न करते. हे नयनरम्य दृष्य पाहण्यासाठी हजारो पर्यटक भंडारदरा धरण परिसरात येत आहेत.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
* व्हाट्सप संपर्क *
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in